बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राखी जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)

चला जाऊया पूर्व विदर्भ पर्यटनाला
बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



वर्ष -९ | गोंदिया | अंक २३ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार,दि.१३ ते १९ मे २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


## 'ते' शासन परिपत्रक अद्यापही कचरापेटीतच?

### लॉकडाऊनमध्ये ग्रामीण भागातील अनेक कर्मचारी फुर्रर्ऽऽऽ

**सुरेश भदाडे**

**देवरी:** ग्रामीण भागातील कर्मचारी मुख्यालयी राहण्यासंबंधाने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने एक परिपत्रक ९ सप्टेंबर २०१९रोजी काढले होते. मात्र, प्रशासकीय व्यवस्थेने ते परिपत्रक जाणीवपूर्वक लागू न केल्याने अनेक कर्मचारी आजही मुख्यालयी राहत नसल्याचे चित्र आहे. सद्यःस्थितीत कोविड-१९चे संकट देशावर घोंघावत असताना लोकशिक्षण आणि अडलेल्यांना व प्रशासनाला ग्रामीण कर्मचाऱ्यांच्या मदतीची गरज असताना अनेक कर्मचारी हे मुख्यालयातून गायब असून इतर जिल्ह्यात वास्तव्यास आहेत. परिणामी, शासनाला या कर्मचाऱ्यांनी पुरविलेली माहिती वा केलेली उपाययोजना किती प्रभावी असेल, हे संशयास्पद आहे. प्रशासनाने ते परिपत्रक कचराकुंडीत टाकल्याची समज त्या कर्मचाऱ्यांची झाल्याने लॉकडाऊनच्या कठीण समयी के मुख्यालयातून फुर्रर्ऽऽऽ झाल्याची माहिती समोर येत आहे. यावरून शासन-प्रशासनाने आतातरी त्या परिपत्रकाचे पालन करून अशा कर्मचाऱ्यांवर शिस्तीची बडगा किमान या कठीण समयी तरी उगारावा, अशी रास्त मागणी ग्रामीण भागातून पुढे आली आहे.

जिल्हा परिषदांमार्फत राज्य व केंद्र शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची ग्रामीण भागात यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी जि.प.मार्फत वर्ग ३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. अशा कम चाऱ्यांकडून या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाण्याची रास्त अपेक्षा आहे. मात्र, कर्मचारी आपल्या मुख्यालयात राहत नसल्याने शासकीय योजनांची योग्यरीत्या अंमलबजावणी होताना दिसत नाही. कर्मचारी हे निवडक पदाधिकाऱ्यांना खुश करून आपली जबाबदारी झटकत असल्याचा आरोप अनेकदा ग्रामीण भागातून होताना दिसतो.

संपूर्ण देश कोरोना नामक संकटाशी दोन हात करीत आहे. देशाच्या पंतप्रधानापासून तर मुख्यमंत्री. पोलिस विभाग, आरोग्य विभाग आणि महसूल विभाग राबराब राबत आहे. संसर्ग टाळण्यासाठी सर्व कार्यालये बंद करून घरून कामे करण्याचा सल्ला दिला आहे. असे असले तरी कार्यालयाची कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियंत्रणात ठेऊन आळीपाळीने कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर बोलावले जाते. अशा परिस्थितीमध्ये जिल्ह्याबाहेरून आणि विशेषतः रेड झोन मधून ये-जा करणारे कर्मचारी हे ऑफिसला बुट्टी मारत असल्याचे चित्र आहे. तर काही कर्मचारी लपूनछपून रेडझोन ओलांडून सुद्धा जिल्ह्यात दाखल झाल्याचे बोलले जाते. यामुळे जिल्ह्यात कोरोना संक्रमणाचा धोका संभवतो. यावर शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मुख्यालयी राहण्यासंबधीच्या नियमात पंचायत राज समितीने त्यांच्या ४थ्या अनुपालन अहवालातील प्रकरण ६ व २९व्या अहवालात काही शिफारशी केल्या होत्या. यावरून वित्त विभागाने ७ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयामध्ये जिल्हा परिषदेतील ग्रामसेवक, शिक्षक आणि संबंधित आरोग्य कर्मचारी यांना मुख्यालयी राहण्यासदंर्भात ठोस उपाय योजना केल्या होत्या. यासाठी प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आरोग्य सेवक आणि आरोग्य सहायक यांना मुख्यालयी राहण्यासंबंधी संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा ठराव बंधन कारक असल्याचे नियम केले आहेत. जे कर्मचारी या नियमांचे पालन करीत नसतील त्यांना घरभाडे भत्ता देय राहणार नाही, असे स्पष्ट निर्देश शासन निर्णयात दिले आहेत.

मात्र, एका ही कर्मचाऱ्यांनी या संदर्भात ग्रामसभेचा ठराव आपल्या वरिष्ठ कार्यालयास दिला नसल्याचे बोलले जात आहे.. यामध्ये ग्रामसेवकांची भूमिका संशयास्पद असून अनेक गावप्रमुखांना या निर्णयाची साधी माहिती सुद्धा नसल्याचे दिसून आले आहे. ग्रामस्थ आणि ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना याबाबतीत अंधारात ठेवण्याचे धोरण कर्मचाऱ्यांनी आखले असून वरिष्ठांचे अशा कर्मचाऱ्यांवर वरदहस्त असल्याची चर्चा आहे. यातून अधिकाऱ्यांचे अर्थ(?)कारण सुद्धा पूर्ण होत असल्याचे समोर येत आहे. असे असले तरी ग्रामीण भागात या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने गरजूंना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. कर्मचारी आणि काही ग्राम पंचायतीचे पदाधिकारी आपापसांत संगनमत करून आपले हित साधत असल्याचे चित्र जिल्ह्यात आहेत. परिणामी, गरजू आणि गरीब नागरिक विनाकारण नागवल्या जात आहे. परिणामी,शासनाने या निर्णयाची अमलबजावणी करावी आणि सर्व ग्रामसभांना या निर्णयाची माहिती होण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी ग्रामीण भागातून पुढे आली आहे.

## वाळूमाफियांचा तहसिलदारासह मंडळ अधिकारी व तलाठ्यावर जीवघेणा हल्ला

**भंडारा-** जिल्ह्यातील पवनी तालुक्यात वाळू माफियाकडून पवनी तहसिलदारासंह मंडळ अधिकारी व तलाठ्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. सदरील घटना मंगळवार (दि.१२) पहाटे पाच वाजेच्या सुमारास निलज व भिवापूरजवळील मरू नदीवरील पुलावर घडली. या घटनेने प्रशासनात खळबळ उडाली असून त्यामुळे अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

वाळू वाहतूक करणाऱ्यांची दादागिरी वाढतच असून सर्वसाम न्यांवर त्यांची दादागिरी करण्याची वृत्ती बळावली आहे.नागपुरातील गुंडप्रवृत्तीच्या या वाळूमाफियांना स्थानिक जिल्ह्यातील काही राजकारणातील पांढरपेश्यालोंकाचेही पाठबळ असल्यानेच वाळूमाफिये अधिकारी व कर्मचाऱ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.

सविस्तर असे की पवनी तालुक्यातील बंद पडलेल्या गुडेगाव वाळू घाटावरून अवैधरीत्या वाळूची उपसा होत असल्याची माहिती तहसीलदार गजानन कोकुर्डे यांना प्राप्त होताच आपल्या Mh



32-Ah 7308 या पांढऱ्या रंगाच्या स्कोडा गाडीने नीलज येथे पोचले.तिथे आधीच पोचलेले मंडळ अधिकारी कावटे व तलाठी पाटील हे आल्टो कारने पोचले होते.दरम्यान नीलज येथून ट्रक क्रमांक MH40BC8674, MH49AT8675 ने भिवापूरकडे वाळू नेत असल्याचे दिसताच या दोन्ही ट्रकला तहसीलदार कोकुर्डे यांनी थांबवले.तेवढ्यातच ट्रक मालक नागपूर(खरबी)निवासी निजामुल खान ऊर्फ कल्लू खान,रब्बुल खान,कलाम खान,फिरोज खान आणि डब्लू. खान तिथे पोचले आणि ट्रक सोडण्यासाठी तहसिलदारावर दबावतंत्र वापरून दादागिरी करू लागले.

परंतु तहसीलदारांनी त्यांचे न एकता तलाठी व मंडळ अधिकाऱ्याला ट्रकवर बसवून दोन्ही ट्रक तहसील कार्यालयात घेऊन येण्याचे निर्देश दिले.तेव्हा वाळूमाफि यांनी तलाठ्याला मारहाण केली तर कलाम खान या इसमाने दगडाने तलाठ्याच्या डोक्यावर मारण्याचा तसेच ट्रक खाली पाडून दोन्ही ट्रक घटनास्थळावरून पळवून नेले.वाळूमाफिया ट्रक पळवून नेत असल्याचे तहसीलदार कोकुर्डे यांच्या लक्षात येताच त्यांनी आपल्या स्कोडा कार क्रमांक mh32ah7308वाहनाने पाठलाग केला.आणि भिवापूर पोलिस ठाणेतंर्गत येत असलेल्या मरू नदीवरील पुलावर आपले वाहन समोर उभे केले असता तहसिलदाराला गाडीजवळून दूर होण्याची धमकी देत तहसीलदारांच्या गाडीवर ट्रक चढविण्याचा प्रयत्न करीत कारला ठोकर मारत ट्रक पळवून नेले.यामध्ये तहसीलदारांची कारचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले,या घटनेत तहसीलदार कोकर्डे व मंडळअधिकारी कावटे हे मात्र बालबाल बचावले.

त्यानंतर पवनी तहसीलदार कोकुर्डे यांनी भिवापूर पोलिस ठाणे गाठले.तिथे पोलिस निरीक्षक भोर्डकर यांनी सदर प्रकरणात जिरो एफआयआर दाखल करीत पवनी पोलिस ठाण्यास पाठविले.

याप्रकरणातील आरोपी इनाजुल खान ऊर्फ कल्लू खान,रब्बूल खान यांनी यापूर्वीही नागपुरातील नंदनवन पोलिस ठाणेंतर्गत कार्यरत महिला तहसीलदारांच्या अंगावर खरबी येथे वाहन चढविण्याचा प्रयत्न केला होता.त्याप्रकरणातही उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने सुम टो घेत नंदनवन पोलिस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आले होते.त्या प्रकरणात आजही २ ट्रक नंदनवन पोलिसांच्या ताब्यात आहेत.या वाळूमाफियांवर अनेक पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल असून वाळू वाहतूक करणाऱ्यांची दादागिरी वाढतच असून सर्वसामान्यांवर त्यांची दादागिरी करण्याची वृत्ती बळावली आहे

महसूल यंत्रणा करोनाच्या पार्श्वभूमीवर कामात गुंतल्याचा फायदा घेत रॉयल्टी चोरांनी माती, दगड, रेती, खडी आदी गौणखनिजाची विना रॉयल्टी वाहतूक करून शासनाच्या लाखो रुपयांच्या महसुलाची हानी केल्याचे प्रकार समोर आला आहे. तसेच गोंदिया जिल्ह्यासह राज्यातल्या अनेक भागात वाळू तस्करांची मुजोरी वाढली आहे. स्थानिक अधिकाऱ्यांना हाताशी धरून हे तस्कर वाळूचा बेसुमार उपसा करत असतात.गोंदियात तर काही गुन्हेगारी स्वरूपाच्या लोकांनी राजकीय नेते म्हणवून घेणाऱ्यांशी हातमिळवणी करीत वाळू तस्करी सुरू केली आहे. ही वाळू तस्करी रोखण्यासाठी धडाडीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यावरच असा हल्ला झाल्याने सध्या महसूल प्रशासनात भीतीचे वातावरण पसरले आहे

## गोंदिया जिल्हा दुग्धसंघावर प्रशासक नेमा,यादवांचे केदारांना निवेदन

**गोंदिया**-जिल्ह्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी तयार करण्यात आलेला गोंदिया जिल्हा दुध संघ हा आपला मुळ उद्देश साध्य करण्यात अपयशी राहिला आहे.त्यातच गेल्या १५ वर्षाच्या कार्यकाळात संघाची आर्थिकपरिस्थिती डबघाईस आली असून दुध उत्पादकांचे कोट्यवधीचे देयके संघाकडे प्रलबिंत आहेत.ते देयके देण्याची सध्याची परिस्थिती संघाची नसल्याने संघावर



तत्काळ प्रशासक नेमण्यात यावे अशी मागणी जिल्हा दुग्धसंघाचे माजी संचालक व शिवसेना नेता पंकज यादव यांनी केली आहे.यादव यांनी राज्याचे पशुसंवर्धन व दुग्ध विकास तथा क्रीडा एवं युवक कल्याण मंत्री सुनिल केदार यांची गोंदिया येथे भेट घेऊन यांसदर्भातील निवेदन सादर केले.निवेदनात मागील ५ वर्षाचा ऑडिट शासकीय स्तरावर करण्यात यावे अशीही मागणी केली आहे.

## गोंदिया ग्रीनझोनमध्येच,फक्त ८ अहवालांची प्रतीक्षा

**गोंदिया**-कोरोना विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे.या उपाययोजनांमुळेच जिल्ह्यात कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यात यश आले असून ३२ दिवसाच्या कालावधीत एकही नवीन रुग्ण न आढळल्यामुळे गोंदिया जिल्हा ग्रीन झोनमध्ये कायम राहिला आहे.तर प्रयोगशाळेत पाठविलेल्या अहवालापैंकी फक्त ८ अहवालांची प्रतीक्षा जिल्ह्याला आहे.

जिल्ह्यात बाहेर जिल्ह्यातून येणाऱ्या नागरिकांची सावधगिरीचा उपाय म्हणून आरोग्य तपासणी करण्यात येत आहे.काही व्यक्ती घरी तर काही व्यक्तींना शासकीय संस्थात्मक अलगीकरण तर काहींना विलगीकरण कक्षात ठेवण्यात येत आहे.कोरोना संशयित व्यक्तीच्या घशातील स्त्रावाचे नमुने तपासणीसाठी नियमित नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहे.आतापर्यत जिल्ह्यातील एकूण ३३६ व्यकतींच्या घशातील स्त्रावाचे नमुने कोरोना चाचणीसाठी नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते.त्यापैकी ३२८ व्यक्तीच्या घशातील स्त्रावांच्या नमुन्याचा चाचणी अहवाल प्राप्त झाला आहे.यामध्ये ३२७ नमुन्यांचा चाचणी अहवाल नकारात्मक आला असून १ नमुना यापूर्वीच सकारात्मक आला आहे.८ व्यक्तीच्या घशातील स्त्रावाचे नमुने तपासणीसाठी १२ मे रोजी नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहे.एकूण ८ नमुन्यांचे चाचणी अहवाल प्रलंबित आहे.

जिल्ह्यात एक रुग्ण २६ मार्चला कोरोना बाधित आढळून आला होता.त्या रुग्णावर उपचार करण्यात आले. त्याचा चाचणी अहवाल १०

सहा शासकीय संस्थात्मक अलगीकरण केंद्रात जिल्ह्यात ६३ व्यक्ती उपचार घेत आहेत.नवीन जिल्हा क्रीडा संकुल येथील कोविड केअर सेंटरमधील विलगिकरण कक्षात ६० व्यक्ती उपचार घेत आहे.

## कंत्राटी डॉक्टरांच्या मानधनात कपात

**आमगाव :** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव बघता आरोग्य विभागातील डॉक्टर , नर्स, सफाई कामगार रात्रंदिवस आपला जीव धोक्यात घालून कर्तव्य बजावीत आहेत. अनेक आरोग्य केंद्रात पीपीई किट (संरक्षक साहित्य) उपलब्ध नसतानाही आरोग्य विभातील कर्मचारी सेवा देत आहेत. त्यांचा या कार्याबद्दल पंतप्रधान व मुख्यमंर्त्यांसह सर्वच स्तरातून कौतुक केले जात असतानाच कंत्राटी डॉक्टरांच्या मानधनात कपात करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे अनेक डॉक्टर नाराज झाले असून काही डॉक्टरांनी राजीनामा देण्याची तयारी दर्शविली आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात कंत्राटी डॉक्टर वैद्यकीय अधिकारी म्हणून रुग्णांची सेवा करीत आहेत. शासकीय महाविद्यालयातून एमबीबीएस केलेल्या डॉक्टरांना वैद्यकीय सेवा देण्याचे नियम आहेत. तसेच नियम नर्सेसला लागू आहेत. यालाच अनुसरून डॉक्टर व परिचारिका रात्रंदिवस कर्तव्य बजावीत आहेत. शासनाने २० एप्रिल रोजी घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील सर्वच कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना कंत्राटी



सेवा अंतर्गत मानधन लागू करण्यात आले आहे.

कंत्राटी अधिकारी हे राजपत्रित अधिकारी श्रेणीत मोडणारे असून त्यांना सध्याच्या स्थितीत सेवार्थ प्रणाली अंतर्गत वेतन दिले जात आहे. त्यामुळे सातव्या वेतन आयोगाच्या नियमानुसार सर्व भत्ते मिळतात.

सेवार्थ प्रणाली अंतर्गत सर्व भत्ते मिळून या कंत्राटी डॉक्टरांचे वेतन ७५ ते ८० हजार रुपयांपर्यंत जाते. परंतु आता नवीन नियमानुसार कंत्राटी सेवा अंतर्गत मानधन दिले जाणार असून त्यांतर्गत ५५ हजार रुपये मानधन मिळणार आहे. हे मानधन कमी असल्याने डॉक्टरांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

कंत्राटी डॉक्टरांच्या मानधन कपातीचा निर्णय मागे घ्यावा असे या डॉक्टरांनी आरोग्य विभागाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. डॉक्टरांच्या खांद्यावर एका हाताने बंदूक ठेऊन कोरोनाशी लढताना सरकारने दुस?या हाताने त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. काम नाही केले तर निलंबनाची धमकी. चांगले काम करायला पुढे आले तर पगारात कपात हा निर्णय चुकीचा असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

## तब्बल २८ दिवसानंतर "तो" घराबाहेर आला

**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया -** थायलंडची भ्रमंती करून १७ मार्चला एक युवक रायपूर मार्गे गोंदिया पोचतो. २५ मार्चला त्याला जिल्हा रुग्णालयाच्या विलगीकरण केंद्रात दाखल व्हावे लागते. तिथून त्याची १० एप्रिल रोजी सुटका होते. सर्व रिपोर्ट नार्मल येतात. तरीही स्वतःची जबाबदारी जाणून त्याने स्वतःला ९ मे पर्यंत घरात स्वतःला कोंबून घेतले. आपल्यामुळे कुटुंबीय असो वा इतरही यांना उगीचच त्रास नको म्हणून फिजिकल डिस्टेंसिंगचे त्याने काटेकोर पालन केले. या सर्व प्रक्रिया त्याने परिस्थितीचे भान ठेवत पूर्ण केल्या. आणि अखेर २८ दिवसांची लढाई जिंकून घराबाहेरील विश्व बघण्यासाठी तो बाहेर आला.

ही गोष्ट आहे ती गोंदियातील एका युवकाची. विश्वभ्रमणासाठी थायलंड येथे गेलेला हा युवक रेल्वेने रायपूर मार्गे १७ मार्च रोजी गोंदिया गाठले. त्याला कोरोनाचा जिल्ह्यातील पहिला संशयित रुग्ण म्हणून २५ मार्चला जिल्हा रुग्णालयात दाखल केले गेले. रुग्णालयातून १४ दिवसाच्या विलगीकरण प्रक्रिया पूर्ण करून त्याला १० एप्रिलला घरी पाठवण्यात आले. तेव्हापासून त्याने स्वतःला घरीच होम क्वारंटाईनमध्ये ठेवले. तब्बल २८ दिवस तो इतरापासून लांब राहिला. याकरिता घरीच राहून सुद्धा फिजिकल डिस्टंसिंगचे काटेकोर पालन केले. आपल्या स्वतंत्र खोलीत ती दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम बघून वेळ काढायचा. होम क्वारंटाईन असताना सतत १४ दिवस रुग्णालयातील डॉक्टर सकाळी घरी येऊन त्याची तपासणी करायचे. या काळातही डॉक्टरांनी त्याच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती उत्तम असल्याचे सांगितले. सांगितलेल्या नियमांचे त्याने काटेकोर पालन केले. आपल्यापासून कोणालाही त्रास होणार नाही, याची त्याने खबरदारी घेतली. मात्र, असे असले तरीही सोशल मिडियावर त्याच्याबद्दल अनेक अफवा प्रसारित करण्यात आल्या. अशा अफवांवर अंकुश लावण्यासाठी तो सतत जिल्हाधिकारीपासून सर्वांच्या संपर्कात होता. रुग्णालयातील १४ दिवस आपल्यासाठी खूप काही शिकवण देणारे ठरल्याचे तो करोना बाधित युवक आता सांगतो आहे.

दरम्यान, हा युवक ज्या लोकांसोबत थायलंडवरुन परतलेला होता, त्यापैकी काही करोना पॉझिटिव्ह आल्याने त्यांना राजनांदगाव येथे क्वारटांईन करण्यात आले होते. त्या क्वारटांईन झालेल्या रुग्णांच्या माहितीवरून येथील जिल्हाप्रशासन सजग झाले. त्यातच गोंदियातील पॉझिटिव्ह आलेल्या या रुग्णालाही २५ मार्चला आपल्यापैकी एक सहकारी राजनांदगाव येथे पॉझिटिव्ह आल्याचे कळताच केटीएस रुग्णालयाच्या डॉक्टरांना माहिती दिली आणि त्यांनी त्याला लगेच शासकीय रुग्णालयातील विलगीकरण कक्षात ठेवले.



विशेष म्हणजे गोंदियातील जो युवक पॉझिटिव्ह आढळून आला होता, त्याला कुठलेही कोरोनाचे लक्षण आढळले नव्हते. परंतु, घश्यातील स्वाबचे नमुने पॉझिटिव्ह आल्याचे त्याला सांगण्यात आले होते. त्यानंतरही तो घाबरलो नाही. डॉक्टरांनी तुमची शरीर क्षमता चांगली असल्याचे सांगत त्याला धीर दिला.

रुग्णालयात असताना तो त्याच्या आईवडिलासोबत सतत संपर्कात असायचा. कधीही आपल्याला कुठला संक्रमण झालेला आहे, याचे दडपण मनावर येऊ दिले नाही. परिणामी, १४ दिवस कसे रुग्णालयात गेले हे त्याला कळलेच नाही. दररोज रुग्णालयात सकाळी उठून मेडिटेशन व प्राणायाम करायचा.

दररोज गरम पाणी पिणे, दिवसभर सकारात्मक विचार करणे, आपल्या अलगीकरण कक्षात तो सामान्य व्यक्तीसारखाच राहायचा. रुग्णालयातील सर्वच वैद्यकीय अधिकारी,परिचारिका,स्वच्छता कर्मचारी यांचे मनोबल वाढविणारे विचार आणि सहकार्य त्याला मिळत राहिल्याने त्यालाही बरे वाटत होते. फोनवरून घरातील कुटुंबासोबतच शेजारी व नातेवाईकांनी मनोबल वाढविण्यासाठी संपर्क करून सकारात्मक ऊर्जा देत राहिले.

विशेष म्हणजे रुग्णालयात असताना दररोज सोशल मिडियावर त्याच्याबद्दल अनेक पोस्ट व्हायरल व्हायच्या. परंतु, त्याने त्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. आपण कसे चांगले आहोत, हे दाखविण्यासाठी तो सतत व्हिडिओ पाठवत होता. रुग्णालयात दिलेल्या प्रत्येक सूचनांचे काटेकोर पालन केल्याने त्याच्यात कोरोनाचे कोणतेही लक्षण अखेर पर्यंत आढळले नाही. त्यातच ८ एप्रिल,९ एप्रिलला पुन्हा घशाचे स्वॉब तपासणीसाठी पाठविण्यात आले. त्याचाही रिपोर्ट १० एप्रिलला निगेटिव्ह आल्याने अखेर त्याला १० एप्रिललाच रुग्णालयातून घरी सोडण्यात आले.

रुग्णालयातून सोडताना रुग्णालयातील प्रत्येक डॉक्टर,नर्स व इतरांनी त्याला उत्साहाने निरोप दिला. घरी पोचताच सर्वांनी फिजिकल डिस्टंसिंग पाळत त्याचे स्वागत केले. त्यानंतरही १४ दिवस तो होमक्वारटांईन राहिला. या काळात घरातील सदस्यांशी अंतर ठेवून तो संवाद साधायचा. रुग्णालयातील आपल्या दिनचर्येविषयी चर्चा करायचा.

या काळात त्याला अनेकांनी फोनवरून प्रोत्साहित केले. त्यांनी व प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे त्याने तंतोतंत पालन केले. दरम्यान, दरदिवशी रुग्णालयातून माझी विचारपूस करण्यासाठी डॉक्टर यायचे. इम्यूनसिस्टम स्ट्राँग असल्याचे त्याला सांगायचे. याचा त्याला भरपूर फायदा झाला. या सर्व प्रक्रिया अत्यंत जबाबदारीने पूर्ण करून अखेर ९ मे रोजी घराबाहेरील विश्व पाहण्यासाठी त्याने घराचा उंबरठा ओलांडला.

कोरोनाला घाबरून न जाता त्याचा कणखरपणे सामना करणे, अत्यंत लाभाचे आहे. सुरक्षा आणि काळजी घेणे, हे तर अत्यावश्यक आहेच. पण तरीही चुकून कोरोनाची लागण झालीच, तर डगमगून न जाता नियमांचे काटेकोर पालन केले तर कोरोनाचा लढा आपण सहज जिंकू सुद्धा शकतो, असे तो सांगायला विसरला नाही. प्रत्येकाने, स्वतःची, कुटुंबाची आणि आपल्या देशवासीयांची काळजी कशी घेतली पाहिजे, याची शिकवण कोरोनाशी लढताना मिळाल्याचे त्याने म्हटले.

## विधानपरिषद निवडणुकीत मुख्यमंत्र्यांसह १३अर्ज वैद्य,निवडणूक होणार बिनविरोध



**मुंबई:** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह १० जणांनी विधानपरिषद निवडणुकीसाठी सोमवारी उमेदवारी अर्ज सादर केला. २१ मे रोजी नऊ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीकरता एकूण १३ उमेदवार रिंगणात असले तरी ही निवडणूक बिनविरोध होईल असे चित्र आहे.मुख्यमंत्री ठाकरे यांनी अर्ज भरला त्यावेळी त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे, पुत्र आदित्य व तेजस तसेच शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसचे नेते उपस्थित होते. उमेदवारी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी ठाकरे यांच्यासह शिवसेनेच्या डॉ. नीलम गो-हे, राष्ट्रवादीचे शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, किरण पावसकर, शिवाजीराव गर्जे, काँग्रेसचे राजेश राठोड, भाजपचे संदीप लेले, रमेश कराड व अपक्ष शेहबाज राठोड या दहा जणांनी आपले अर्ज दाखल केले. तर भाजपचे गोपीचंद पडळकर, रणजितसिंह मोहिते पाटील, डॉ. अजित गोपछेडे आणि प्रवीण दटके यांनी ८ मे रोजी अर्ज भरला होता. राष्ट्रवादीकडून किरण पावसकर व शिवाजीराव गर्जे तर भाजपकडून संदीप लेले व रमेश कराड यांनी डमी म्हणून भरले आहेत. अधिकृत उमेदवाराचा अर्ज एखादवेळी अवैध ठरला तर? हा विचार करून असे अर्ज भरले जातात.छाननीत अधिकृत उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्यानंतर डमी उमेदवार आपले अर्ज मागे घेतील. उमेदवारी अर्जांची छाननी १२ मे रोजी अपक्ष शेहबाज राठोड यांचा अर्ज बाद झाला आहे.

### १५४.८० कोटींची ठाकरे दाम्पत्याकडे संपत्ती

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांच्याकडे १५४ कोटी ८० लाख रुपये इतकी संपत्ती आहे. त्यात उद्धव ठाकरेंकडे २४ कोटी १४ लाख चल संपत्ती आणि रश्मी यांच्याकडे ३६ कोटी १६ लाख रुपयांची अचल संपत्ती आहे.

### मुख्यमंत्र्यांना ६ महिन्यांच्या आत आमदार होणे आवश्यक असते

उद्धव ठाकरे विधानसभेचे सदस्य नसताना मुख्यमंत्री झाले होते. अशा परिस्थितीत मुख्यमंर्त्यांना ६ महिन्यांच्या आत आमदार होणे आवश्यक असते. उद्धव ठाकरे यांची ती मुदत २७ मे रोजी संपत आहे. आघाडीने ६ उमेदवार दिल्यास निवडणूक झाली असती. २१ मे रोजी मतमोजणी होती. नवनिर्वाचित सदस्यांना आमदारकीची शपथ घ्यावी लागते. आता निवडणूक बिनविरोध होणार असल्याने १४ मे रोजी उमेदवारांच्या निवडीची घोषणा होईल.

### विधानसभा पक्षीय बलाबल :

भाजप १०५, शिवसेना ५६, राष्ट्रवादी ५४, काँग्रेस ४४, छोटे पक्ष १६, अपक्ष १ आमदार आहेत. - एका उमेदवारास विजयी होण्यासाठी पहिल्या पसंतीची २९ मते (कोटा) आवश्यक आहेत.

## संपादकीय

### लॉकडाऊनच्या आडमुठे धोरणात फसले परराज्यातील मजूर

संपूर्ण देशभरात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनला ५० दिवस झाले आहेत. लॉकडाऊनचा हा तिसरा टप्पा मुंबईसह संपूर्ण राज्यासाठी अत्यंत कठीण परीक्षेचा काळ असणार आहे. हा लॉकडाऊन मे महिन्याच्या अंतिम आठवड्यापर्यंत लांबवला जाऊ शकतो. एकीकडे कोरोनामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढते आहे, तर कोरोना बाधितांचे आकडे दर दिवशी राज्यासमोरचे संकट गडद करीत आहेत. पोलीस आणि आरोग्य विभागावरचा ताण गंभीरपणे वाढतो आहे. पोलिसांवर होत असलेले हल्ले, त्यांचे खचलेले मनोबल, त्यांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष आणि दुसरीकडे कोलमडलेली आरोग्य यंत्रणा याकडे राज्य सरकारने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.कोरोना व्हायरसच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे अनेक मजूर विविध ठिकाणी अडकून पडले आहेत. त्यामुळे हे मजूर मिळेल त्या रस्त्याने घर गाठण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा स्थितीत रात्रीच्या विसाव्यासाठी रेल्वे मार्गाचा आधार घेणा–या १६ मजुरांवर औरंगाबादमध्ये काळाने घाला घातला, या दुर्दैवी घटनेने राज्य सरकारमधील समन्वयाचा अभाव, नियोजनाचा उडालेला फज्जा, परप्रांतीय वा पर जिल्ह्यातील मजुरांप्रती कोणतीच ठोस उपाययोजना नसणे, सरकारी अधिकारी आणि काही प्रमाणात पोलिसांकडूनही होणारी स्थानिकांची लूटमार, दादागिरी अशा सर्वच पातळीवर सरकारचे अपयशच समोर येते आहे.

आता स्थलांतरित मजुरांच्या प्रश्नावरून राज्या–राज्यांमध्ये संघर्ष सुरू झालेला आहे. केंद्राने स्थलांतरित मजुरांकडे आधी लक्ष दिले नाही. या मजुरांचे काय करायचे ते राज्यांनी बघून घ्यावे, अशी बघ्याची भूमिका केंद्राने घेतली. पण आता हा प्रश्न हाताबाहेर गेल्यानंतर त्याचे खापर महाराष्ट्रासारख्या विकसित राज्यावर फोडले जात असल्याचे पाहायला मिळाले. राज्याच्या विकासात स्थलांतरित मजुरांचा वाटा मोठा आहे, मग त्यांची जबाबदारी महाराष्ट्राने का घेऊ नये, असा सवाल उपस्थित केला गेला. पण देशभरातील कामे महिनाभर बंद असताना मजुरांनाच आपापल्या गावी जायचे असेल तर महाराष्ट्राचे सरकार त्यांना कसे ठेवून घेणार, हा प्रश्न होता. मजुरांच्या तिकिटांचा खर्चदेखील महाराष्ट्रानेच करावा, असे उत्तर प्रदेश, बिहारच्या सरकारला वाटत होते. उत्तर प्रदेश सरकार महाराष्ट्रातील उत्तर भारतीय मजुरांना उत्तर प्रदेशात घेण्याची तयारी दाखवत नव्हते. ही बाब जाहीर केली गेली तेव्हा योगी सरकार नमले. पश्चिम बंगाल सरकारने हीच आडमुठी भूमिका घेतली. बिहारमध्ये या वर्षी विधानसभा निवडणूक होणार असल्याने मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राजकारण डोळ्यासमोर ठेवत अखेर तिकिटांचा खर्च करण्याचे मान्य केले. कर्नाटक सरकार त्यांच्या राज्यातील मजुरांना परत जाऊ देत नव्हते पण महाराष्ट्रातील कन्नड भाषिक मजुरांना परत घेण्यासही तयार नव्हते. कर्नाटकने इथेही महाराष्ट्राशी संघर्ष कायम ठेवला. प्रत्येक मजुराची चाचणी करून महाराष्ट्राला पाठवणे शक्य नव्हते.टाळेबंदीतही करोनाचे रुग्ण झपाट्याने वाढू लागले आहेत. जून–जुलैमध्ये करोनाच्या प्रादुर्भावाचे शिखर गाठले जाईल असा अंदाज सातत्याने व्यक्त होत असल्याने केंद्र सरकारवर दबाव वाढलेला आहे. दिल्लीत बैठकांच्या फेऱ्या वाढलेल्या आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आदेशपत्रांतही वाढ झालेली आहे. टाळेबंदीत रुग्णांची संख्या वाढली कशी, अशी विचारणा केंद्राकडून राज्यांना होताना दिसते. महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, तमिळनाडू, दिल्ली, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश अशा काही राज्यांच्या प्रशासनावर केंद्राचा विश्वास कमी झालेला दिसतो. कदाचित त्यामुळे या राज्यांमधील महत्त्वाच्या शहरांमध्ये केंद्रीय पथके पाठवली जात आहेत. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जात आहेत. राज्यांनी टाळेबंदी काटेकोरपणे अमलात आणली नसल्याने रुग्णांची संख्या वाढत असल्याचे केंद्र सरकारला वाटते. गेल्या आठवडयात केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत तसे स्पष्टपणे बोलून दाखवले गेले. त्यामुळे राज्य सरकारे ‘अपयशी’ होत असतील तर केंद्रीय पथके वारंवार पाठवली जातील, राज्यांच्या वतीने केंद्रीय पथके निर्णय घेतील असे दिसू लागले आहे. केंद्रीय सहसचिव लव अगरवाल यांच्या मुंबई भेटीनंतर लगेच प्रशासकीय बदल करण्यात आले.

राज्यात मोलमजुरीसाठी आलेल्या परराज्यातील मजूरवर्गाला आपल्या राज्यात परतण्याची ओढ लागली आहे. अनेक स्थलांतरित मजूर, विद्यार्थी परराज्यात अडकले आहेत. विशेष ट्रेन किंवा बसच्या माध्यमातून या मजुरांना आपापल्या राज्यात नेण्याची व्यवस्था हळुहळू केली जात आहे. देशाच्या विविध भागातून श्रमिक एक्सप्रेस निघाल्या आहेत. भूक, पैशांची कमतरता, कोरोनाची भीती आणि कुटुंबाची ओढ अशा विविध कारणांमुळे धीर सुटलेल्या मजुरांनी आधीच आपल्या घरची वाट धरली होती. काहीजण हजारो किलोमीटर आणि कित्येक दिवसांच्या प्रवासानंतर घरी पोहोचले, तर कोणाला वाटेतच प्राण सोडावे लागल्याच्या करुण कहाण्या समोर आल्या आहेत. यातल्या बहूतांश मजुरांना राज्य शासन आपल्यासाठी काही उपाययोजना करेल याबद्दल आश्वासकता वाटत नाही.

## ते वजनदार नेते महसुल बुडविणाऱ्या रेती चोरावर कारवाईचे आदेश देणार काय?

**साकोली(राकेश भाष्कर):** तालुक्यातील महालगाव रेती घाटावर एका रेती तस्कराकडून तीन लोकांनी तीस हजार रुपये घेतले.प्रकरण अंगलट येणार कळताच त्या तिघांनी घेतलेले तीस हजार निलज येथील ट्रॅक्टर मालक गहाणेला परत केले.रेती तस्करीमध्ये असलेल्या या ट्रक्टरमालकाने जिल्ह्यातील वजनदार असलेल्या नेत्यालाच आपल्याकडून पोलिसांनी पैसे घेतल्याचे सांगून टाकले.त्या वजनदार नेत्यांनेही लगेच पोलीस अधिक्षकांचे कान टोचले आणि त्या तिघापैकी एकाला निलबिंत करुन टाकले.मात्र या प्रकरणात ज्यांने रेती चोरली तो चोर मात्र तालुक्यात इमानदार ठरल्याची चर्चा सुरु झाल्याने त्या वजनदार नेत्यांने किमान आपल्या पदाची गरिमा बघत अशा रेती चोरावंरही कारवाई का केली नाही,अशा सुर उमटू लागला आहे.

३० हजार पोलिसांना दिले सांगणाऱ्या त्या रेती तस्कराने महसुल विभागाचा मात्र ९० हजाराचा महसुल बुडविला त्याचे काय?हे सर्व झाल्यानंतर निलबिंत पोलीस कर्मचाऱ्याची चौकशी सुरु झाली आहे.मात्र ज्या गहाणे नामक रेती चोराने नेत्याकडे तक्रार केली त्यानेच पोलिसांच्या चौकशीत मात्र आपण कुणालाही पैसे दिले नसल्याचे सांगितल्याचे समोर आले आहे.जर या रेती चोराने पैसेच दिले नव्हते तर त्या नेत्याकडे तक्रार करायची गरज का पडली अशाही प्रश्न आता समोर आला आहे.

यात ज्या ट्रक्टरमालकाकडून अवैध रेती वाहतुकीच्या नावावर ज्या पोलिसांनी पैसे घेतले,त्यांनी कुणाच्या आशिर्वादाने घेतले. मग पैसे घेतले तर पोलीस ठाण्याला का माहिति दिली नाही.मग घेतलेले पैसे का परत केले या सर्व प्रकरणामुळे त्या तीन पोलिसांवर कर्तव्यात कसुर केल्याचा ठपका विभागाने ठेवला असेल यात शंकाच नाही.परंतु जो व्यक्ती विनारॉयल्टी रेतीची तस्करी करुन शासनाचा महसुल बुडवत असेल आणि सध्याच्या परिस्थितीत राज्याची आर्थिक स्थिती ही संकटात असताना अशा रेती चोरांना मात्तबर नेत्यांने पाठबळ देणे हे सुध्दा अयोग्यच म्हणावे लागेल.

रेती चोराकडून पैसे घेतल्याप्रकरणी जर त्या पोलिसांवर कारवाई होऊ शकते तर त्या रेती चोरावर का नाही अशा प्रश्न जनमानसात चर्चेला जाऊ लागला आहे.त्यामुळे त्या नेत्याने त्या पोलिसांसोबतच शासनाचा महसुल बुडविणाऱ्या त्या रेती चोरावर तत्काळ कारवाई करण्यासाठी पोलीस प्रशासनाला निर्देश दिल्यास त्या नेत्याबद्दल जो संदेश चोरांना वाचविल्याबद्दल जात आहे,त्यावर कुठे तरी पुर्णविराम लागेल यात शंका नाही.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# जनतेचे आमदार संघाने थकवलेले पैसे दुध उत्पादकांना मिळवून देणार?

**गोंदिया::** बंद दुध संकलन केंद्र सुरु करण्यासाठी जनतेचे आमदार विनोद अग्रवाल यांनी जिल्हा दुध संघाकडून माहिती घेत पुढाकार घेतल्याचे त्यांच्यावतीने देण्यात आलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले गेले आहे.तेव्हा बंद दुध संकलन सुरु करण्यासाठी पुढाकार घेणारे जनतेचे आमदार आत्ता दुध उत्पादक शेतकऱ्यांचे २०१७ पासूनचे थकलेले कोट्यावधी रुपयाचे देयके जिल्हा दुध संघाकडून मिळवून देणार काय अशा प्रश्न गावपातळीवरील संस्थेच्या दुध उत्पादकांनी केला आहे.त्यामुळे जनतेचे आमदार या प्रश्नात संघाच्या बाजूने राहतात की जनतेच्या बाजूने जात खरा न्याय मिळवून देतात का याकडे नजरा खिळल्या आहेत.

गोंदिया जिल्ह्यात सुरु असलेले शासकीय दुध संकलन केंद्र सातगाव, कोहमारा व गोंदियातील केंद्रावर गेल्या डिसेंबर महिन्यापासून दुध संकलन बंद असल्याने ते बंद पडले आहेत. विशेष म्हणजे या दुध संकलन केंद्रात दुधाचा पुरवठा करण्यासाठी जिल्ह्यात दुध सहकारी संघ २००४ मध्ये अस्तित्वात आला.हा संघ अस्तित्वात येऊन १५ वर्ष झाली.परंतु या संघाने दुध उत्पादक शेतकरी व गावपातळीवरील दुग्ध संस्थाचा विकास साधला असे चित्र नसून याउलट जिल्हा दुग्ध संघाची परिस्थिती बिकट झाली आहे.कर्मचारी अधिकारी यांचे वेतन द्यायलाही पुरेसा पैसा नसल्याचे वृत्त असून दुध उत्पादक शेतकऱ्यांचे २०१७ पासूनचे कोट्यावधी रुपयाचे देयके संघाकडे प्रलबिंत असल्याने हे दुग्धसंस्थेचे शेतकरी न्यायालयापर्यंत पोचले आहेत. त्यातच संकलीत होणारा दुध कमी असल्याचे कारण पुढे करुन दुग्ध सहकारी संस्थाच्या आयुक्तांनी शासकीय दुध संकलन केंद्रच बंद करण्याचा निर्णय काही दिवसापुर्वी घेतला होता.तेव्हापासून दुध संकलन जिल्ह्यात बंद पडलेले आहे, ते (दि.११)पुन्हा सुरु झाले आहे.

सरकारने ठरवून दिलेल्या हमी भावापेक्षा पाच रुपयांनी कमी दराने दूध खरेदी करणाऱ्या गोंदिया जिल्हा दूध संघाचे संचालक मंडळ सहा वर्षांसाठी बरखास्त करण्याचा सहकारी संस्था (दुग्ध) नागपूरचे विभागीय उपनिबंधक एस. एन. क्षीरसागर यांचा आदेश सहनिबंधकांनी कायम ठेवत सहनिबंधकांच्या सुनावणी अहवालानुसार नागपूर विभागीय उपनिबंधक(दुग्ध)यांनी गोंदिया जिल्हा दुग्ध सहकारी संस्थाच्या संघावर प्रशासक नेमले होते.सरकारने गायीच्या दुधासाठी २७ तर म्हशीच्या दुधासाठी ३६ रुपये प्रती लिटर इतका हमी भाव निर्धारित केला आहे. हा दर दूध उत्पादकांना देणे बंधनकारक आहे. पण, संघ तोट्यात असल्याचे कारण पुढे करीत संचालक मंडळाने प्राथमिक दूध संस्था व शेतकऱ्यांना २२ रुपये दराने गायीच्या दुधाला



दर दिल्याची तक्रार विभागीय उपनिबंधकांसह जिल्हाधिकारी व सरकारकडे करण्यात आली होती. त्यानंतर दूध संघ लक्ष देत नसल्याचे पाहून संस्थांनी न्यायालयातही धाव घेतली. दूध उत्पादकांच्या तक्रारीच्या आधारे विभागीय उपनिबंधकांनी २१ एप्रिल रोजी सुनावणी केली होती.मात्र अंतिम सुनावणी १८ जून रोजी संघातर्फे कुणीही उपस्थित न झाल्याने आणि हमी भाव देणे बंधनकारक असतानाही सरकारी निर्णयाचे पालन न केल्याचा ठपका ठेवत संचालक मंडळाला जबाबदार ठरवित विभागीय उपनिबंधक क्षीरसागर यांनी मंडळाला सहा वर्षांपासाठी अपात्र ठरवले होते.मात्र राजकीय हस्तक्षेप होत त्यावेळचे तत्कालीन दुग्धविकास मंत्री यांनी संचालक मंडळाला जिवनदान दिले.

पुन्हा संचालक मंडळाच्या हाती दुग्ध संघाची सुत्रे देण्यात आली.त्यानंतर काही दिवस या संघाने दुध संकलन केले.मात्र ११ डिसेबंर २०१९ पासून जिल्ह्यातील दुध संकलनच बंद करण्यात आले असून ५ महिन्याचा कालावधी लोटला आहे.गेल्या ५ महिन्यापासून बंद असलेले दुध संकलन सुरु करण्यासाठी उद्या (दि.११)राज्याचे दुग्धविकास मंत्री सुनिल केदार हे गोंदियाला येत आहेत.बंद दुग्ध संकलन केंद्र सुरु करुन हे दुध भंडारा जिल्हा दुग्धसंघाला पावडर तयार करण्यासाठी देण्यात येणार आहे.परंतु आधीच कर्जबाजारी असलेला हा दुध संघ दुध उत्पादक शेतकऱ्यांची पुर्वीचीच थकबाकी द्यायला टाळाटाळ करीत असतांना पुन्हा शासनाने दुध संकलनाचे परवानगी संघाला दिल्याने दुध उत्पादकांच्या जुन्या समस्यांचे काय अशा प्रश्न आता संघाकडे पैसे असलेले दुध संस्थेचे संचालक विचारू लागले आहेत.

**दुध उत्पादक संस्थांची**

**संघाकडे १ कोटीच्यावर थकबाकी**

२१ जुर्ले २०१७ ते २० नोव्हेंबर २०१९ पर्यत ७० लाख रुपये दुधाचा चुकारा अडलेला आहे.तर १ एप्रील ते २० नोव्हेंबर २०१९ पर्यतचा दुध उत्पादकांचा सुरक्षा निधी १८ लाख रुपये,२२ लाख रुपये दुध उत्पादक संस्थाचे शेयर्सचे असे १ कोटीच्यावरील रक्कम ही दुध संघाकडून घेणे असून संघाची आर्थिक परिस्थिती मात्र हलाखीची झाली आहे.एकेकाळी या दुध संघाकडून २० ते ४० हजार लीटर दुध जिल्ह्यातून संकलित करण्यात यायचे.डिसेंबर २०१९ मध्ये ४०० ते ५०० लीटर दुध संकलीत होत असल्याने ते त्याच्या संकलनावरील खर्चही परवडणारा नसल्याने संघाने जिल्ह्यातील दुध खरेदी डिसेंबर २०१९ पासून बंद केली आहे.त्यामुळे जिल्ह्यातील दुध उत्पादक शेतकरी हा संकटात सापडला असून खासगी डेयरींला दुध विकण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

**शासनाने थेट दुध खरेदीसह संकलन करावे**

आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून जिल्ह्याची ओळख आहे.त्या अनुषगांने शासन आपल्या पातळीवर देवरी, सालेकसा व आमगाव तालुक्यातील दुध शासकीय दुध खरेदी केंद्रावर दुध उत्पादकांकडून खरेदी करते.त्यामुळे या उत्पादक शेतकऱ्यांना २७ रुपये प्रती लिटर दर मिळते.मात्र गोंदिया,तिरोडा,गोरेगाव,सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव या तालुक्यातील दुध गोंदिया जिल्हा दुग्ध संघ खरेदी करते.जर संपुर्ण जिल्हाच नक्षलग्रस्त म्हणून शासन दरबारी नोंद आहे,तर फक्त तीनच तालुक्यातील दुध शासन का खरेदी करते इतर तालुक्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांची दुध संघाकडून होणारी पिळवणूक टाळून शासनाने या उर्वरित तालुक्यातीलही दुध स्वतःखरेदी करावे अशी मागणी दुध उत्पादक व संकंलन संस्थेचे संचालक परस बसेने,सचिन अवस्थी,मयाराम दसरे आदीनी दिली.

गेल्या २१ जानेवारीपासून दुग्धसंघाकडून दुध संकलन बंद असून संकलन केंद्रावर येणारा दुध हा १०० ते २०० लीटर एवढाच असायचा त्यामुळे संकलन बंद करण्यात आले होते.आत्ता शासनाने पुन्हा हे दुधसंकलन केंद्र सुरु करण्याचे निर्देश दिले असून उद्यापासून(दि.११)दुधसंकलन केंद्र सुरु होत आहेत.

याठिकाणी शेतकरी व संस्थाकडून खरेदी केलेला दुध भंडारा जिल्हा दुग्ध संघाला भुकटी तयार करण्यासाठी देण्यात येणार आहे.मात्र ज्या शेतकऱ्यांची आधीची थकबाकी आहे दुग्धसंघाकडे आहे,ती अद्यापही कायम असून एकही रुपया दिलेला नसल्याची माहिती जिल्हा दुग्धविकास अधिकारी व डेयरी मॅनेजर श्री लाखे यांनी बेरार टाईम्सशी बोलतांना दिली.

## करोना प्रादुर्भाव नियंत्रणासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावे- आमदार कोरोटे

**देवरी–** देवरी शहर हे राष्ट्रीय महामार्गावर स्थित आहे. यामुळे या शहरातून आवागमन मोठ्या प्रमाणावर होत असतो. दरम्यान, शासन आणि प्रशासनाने कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केलेल्या टाळेबंदीमध्ये नुकतीच सवलत दिली. असे असताना नागरिकांची हलचल शहरात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. परिणामी, कोविड–१९ चा प्रसार देवरी परिसरात वाढण्याची भीती प्रशासनाने व्यक्त केली आहे. या रोगापासून आपला परिसर आणि आपले आप्तगण यांना सुरक्षित ठेवायचे असेल तर नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे पुढाकार घेवून अनावश्यक गदी आणि हलचल कमी करणे, ही काळाची गरज आहे. अन्यथा आपल्याला मोठ्या संकटाचा सामना भविष्यात करावा लागू शकतो. असे काही घडू नये म्हणून नागरिकांनी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे गांभीर्याने पालन करून सार्वजनिक ठिकाणी गदी करू नये, असे आवाहन आमदार सहेसराम कोरोटे यांनी केले.



देवरी येथे नगरपंचायत सभागृहात आयोजित अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी देवरीच्या नगराध्यक्ष कौशल कुंभरे, उपाध्यक्ष अलताब शेख, तहसीलदार विजय बोरूडे, मुख्याधिकारी अजय पाटणकर, गटविकास अधिकारी चंद्रमणी मडक, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ललित कुकडे, ठाणेदार अजित कदम आदी प्रशासकीय अधिकारी हजर होते.

या बैठकीत अधिकाऱ्यांनी श्री कोरोटे यांना देवरी शहर आणि तालुक्यातील कोविड–१९ संदर्भात माहिती दिली. यामध्ये देवरी शहरातून राष्ट्रीय महामार्ग जात असल्याने या ठिकाणी माणसांचे आवागमन साहजिकच वाढले आहे. यामुळे आपल्याभागात कोविडचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय देवरी शहरात टाळेबंदी दरम्यान नागरिकांना अत्यावश्यक कामासाठी बऱ्याच प्रमाणात सवलती दिल्या गेल्या. परंतु, दुर्दैवाने व्यापाऱ्यांसह नागरिक हे प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करताना दिसत नाही. अनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी सुद्धा नागरिक बाहेर पडत असून अंतराचे पालन करताना दिसत नसल्याचे चित्र आहे. जर परिस्थिती अशीच राहिली तर आपला भाग ग्रीन झोन मधून कधीही रेडझोनमध्ये जाऊ शकतो, अशी माहिती अधिकाऱ्यांनी आमदार महोदयांच्या निदर्शनात आणून देत आणखी काही काळ कडक निर्बंध लावण्याच्या सूचना देखील अधिकाऱ्यांनी केल्या. यावर आमदार कोरोटे यांनी जनतेला आवाहन करीत आपल्या देवरी परिसराला आणि पर्यायाने आपल्या आप्तस्वकीयांना कोविडच्या प्रभावापासून सुरक्षित ठेवायचे असेल तर प्रत्येक नागरिकाने स्वयंस्फूर्तपणे पुढाकार घेण्याची गरज आहे. शासन प्रशासन शक्ती करेल, अशी वेळ कोणीही येऊ देणार नाही, याची खबरदारी प्रत्येकाने घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. अत्यावश्यक नसलेली प्रतिष्ठाने/दुकाने व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तपणे बंद ठेवून कोरोना आपल्या भागात शिरकाव करणार नाही, याची खबरदारी घेऊन सहकार्य करावे.

## जि.प.प्रशासनाने सु.बे. अभियत्यांच्या अडचणींकडे लक्ष द्यावे – इंजी चुटे

**साखरीटोला:** सिंचन सुविधेत वाढ व्हावी, शेतकरी राजाला बळ मिळावे, असे उद्दिष्ट समोर ठेवून गोंदिया जिल्हा परिषदेच्या वतीने ४ मार्च रोजी जिल्हा निधि योजनेतंर्गत विविध कामाचे ई–निविदा सादर करण्यात आले होते. सदर कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना मिळावे म्हणून कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे जि.प. गोंदियाच्या वतीने सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांकरिता ई–निविदा सादर करण्यात आले होते. यात अनेक सु.बे.अभियत्यानी भाग घेऊन निविदा भरले. १९ मार्च रोजी निविदा उघडण्याची तारीख होती. पण नमूद तारखेत निविदा उघडण्यात आली नाही. त्यानंतर कोरोना वायरसमुळे संचारबंदी लागू झाली आणि त्या निविदा तसेच बंद पडून आहेत. यामुळे सु.बे.अभियंत्यांच्या आर्थिक अडचणी वाढल्या असून बेरोजगारीत कमालीची भर पडली आहे.

मागील सहा महिन्यापासून जिल्हा परिषद काम वाटप समितीने सभा बोलावली नाही व काम वाटप केले नाही. बिले मंजूर असून अनेकाचे देयके रखडलेले आहेत. यामुळे सतत आर्थिक समस्या वाढत आहेत, कुटुंबीयांचे पालन पोषण कसे करावे असा प्रश्न निर्माण झाला आहे. करिता सदर निविदा उघडण्यात यावे तसेच काम वाटप समितिने नोंदणीकृत सु.बे.अभियत्यांना ई–पद्धतीने कामे वाटप करून बांधकाम करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी सालेकसा तालुका सु.बे.अभियंता संघटनचे अध्यक्ष इंजी. ऋषिकुमार चुटे यांनी केले आहे.

## विविध संघटनानी दारु विक्रीला केला विरोध



**गोंदिया :** जिल्हा प्रशासनाने बुध्द जयंतीच्या दिवशी दारु विक्रीला परवानगी दिली. याचा येथील संविधान मैत्री संघ, जिल्हा ओबिसी एससी, एसटी, व्हीजेएनटी अल्पसंख्याक संघटनांनी सोमवारी (दि.११) काळ्या फिती लावून निषेध नोंदविला.

जिल्हा प्रशासनाच्या या निर्णया विरोधात संघटनाच्यावतीने मुख्यमंत्र्यांच्या नावे उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांना निवेदन देण्यात आले. निवेदनातून बुद्ध जयंतीच्या दिवशी जिल्हा प्रशासनाच्या दारू विक्री सुरू करण्याच्या निर्णयाच्या चुकीच्या पध्दतीचा सर्व संघटनांनी एकत्रित येऊन विरोध दर्शविला.

हा निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली.संविधान मैत्री संघाचे संयोजक अतुल सतदेवे, वंचित आघाडी व समता संग्राम परिषदेच्यावतीने सतिश बन्सोड, सर्वसमाज जयंती समितीचे पुरुषोत्तम मोदी, अबरार सिद्दिकी, डॉ. नामदेव किरसान, सय्यद कमर अली, वसंत गवळी, शब्बीर पठाण, कैलास भेलावे, विकल संघटनेचे शैलेंद्र गडपायले, बहुजन युवा मंच सुनील भोंगाडे, भारतीय बौद्ध महासभेचे राजेंद्र मेश्राम, अबरार सिद्दीकी, रवी भांडारकर, प्रकाश, प्रकाश, परेश दुरुगवार, सुरेंद्र सोनवाने, राजू नागरीकर, उमेश दमाहे, दिनेश उके, अनिल गोंडाणे, चित्रा पाटील, आभा मेश्राम, पौर्णिमा नागदेवे, नगमा शेख, माधुरी पाटील, लक्ष्मी राऊत, सायमा खान, मीलन चौधरी, अरुण बन्नाटे, संविधान मैत्री संघ संरक्षक प्रतिमा रामटेके, माया मेश्राम, बबीता भालाधारे, गौतमा चिचखेडे आणि सामाजिक संघटनेत ओबीसी संघर्ष कृती समिती, आवामे मुस्लिम गोंदिया, आदिवासी पिपल्स फेडरेशन आदी संघटनाचा सहभाग होता.

# कोरोना तपासणी लॅब:मशिनची क्षमता ३४०

**गोंदिया:** दिवसेंदिवस कोरोनाचा फैलाव वाढत असून कोरोना विषाणूचा संसर्ग वेळीच रोखण्यासाठी कोरोना संशयितांच्या स्वॅबची तपासणी वेळीच होणे गरजेचे आहे. जेणेकरुन कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांवर प्रतिबंधक उपाययोजना व उपचार तात्काळ करणे सोईचे होणार आहे. म्हणूनच शासन आणि प्रशासनाच्या अथक प्रयत्नातून कोल्हापूर जिल्ह्यात सद्या दोन कोव्हिड–१९ तपासणी लॅब सुरु झाल्या आहेत. आतापर्यंत जवळपास १३२० अनुमानित नमुने तपासले आहेत. हे मशीन सीबीनॅट (कार्ट्रिज बेस्ड नुक्लिक ॲसिड ॲप्लिफिकेशन टेस्ट) तंत्रज्ञानावर चालविले जात असून या मशीनची दर दिवसाची तपासणी क्षमता ३४० इतकी आहे. तसेच एक टेस्ट करण्यासाठी ४५ मिनिटे वेळ लागतो.

कोरोनाच्या महामारीनं साऱ्या जगाला हैराण केलं आहे. मात्र कोल्हापूर जिल्ह्यात प्रशासनाने कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना कठोरपणे राबविल्याने कोरोनाच्या भष्मासुराला काही अंशी थोपविणे शक्य होत आहे. लोकांनी घरात राहूनच कोरोनाविरुध्दचे युध्द जिंकावे, यासाठी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी राज्यासमोर कोरोनाअिवरुध्दचा लढा अधिक तीव्र करुन सर्व यंत्रणा गतिमान केल्या. जवळपास ५५ दिवसांचा तीन टप्पातील लॉकडाऊन लागू करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. कोल्हापूर जिल्ह्यात लॉकडाऊनची अंमलबजावणी कठोरपणे करण्यात शहर आणि जिल्ह्यातील एक–न–एक नागरिक कोरोना योध्दा बनून कोरोनाविरुध्दच्या लढाईत उतरला आहे. त्यामुळे कोरोनाविरुध्दचं युध्द कोल्हापूरकर निश्चितपणे जिंकतील, यात मात्र शंका नाही. कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आणि कार्यतत्पर प्रशासनामुळे कोविड–१९ च्या तपासणीमध्ये जिल्हा स्वयंपूर्ण झाला आहे.

कोल्हापूरातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्गत कोविड –१९ च्या दोन तपासणी मशीन कार्यान्वित झाल्या आहेत. कोव्हिड–१९ तपासणी लॅबसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करुन दिला आहे. या प्रयोगशाळामुळे अतिशय कमी वेळात त्याच दिवशी तपासणी करून रिपोर्ट येऊ लागले आहेत. यामुळे जास्तीत जास्त कोविड –१९ चे निदान होऊन लवकर रुग्ण उपचारावर आणणे शक्य झाले आहे. दरम्यानच्या कालावधीत बाधित रुग्णांकडून होणारा प्रसारही थांबला आहे. यापूवी कोविड –१९ तपासणीसाठी पुणे



येथे सॅम्पल पाठवावे लागत होते. त्यासाठी बराच वेळ लागत होता. त्यामुळे कोरोना फैलावही वेगाने होण्याची भीती होती.

कोल्हापूरातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दोन प्रयोगशाळा आणण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील–यड्रावकर यांच्या प्रयत्नांना आणि पाठपुराव्याला यश आले. याकामी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मीनाक्षी गजभिये, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. योगेश साळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बी.सी.केम्पीपाटील यांची अविरत धडपड महत्त्वाची ठरली. एकंदरीत कार्यतत्पर प्रशासक व लोकप्रतिनिधींच्या पाठबळावरच हे साध्य झाले आहे.

पहिले सीबीनॅट– जीन एक्स्पर्ट फॉर कोविड –१९ तपासणी मशीन २४ एप्रिल २०२० रोजी कार्यान्वित झाले. हे मशीन सुरु झाल्यापासुन आतापर्यत (९ मे २०२० पर्यत) १६५ इतके अनुमानित नमुने तपासणी केले. तर यामधुन ३ कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण सापडले आहेत. तर दुसरे आर. टी. पी. सी. आर कोविड –१९ तपासणी मशीन १ मे २०२० रोजी कार्यान्वित झाले आहे. हे मशीन सुरु झाल्यापासून आता पर्यत (९ मे २०२० पर्यत) ११५५ इतके अनुमानित नमुने तपासणी केले आहेत. यामधुन ६ कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण सापडले आहेत.

**१) सीबीनॅट जीन एक्स्पर्ट मशीन फॉर कोविड – १९ :** – हे मशीन सीबीनॅट (कार्ट्रिज बेस्ड नुक्लिक ?सिड ॲप्लिफिकेशन टेस्ट) तंत्रज्ञानावर चालविले जाते. या मशीनची दर दिवसाची तपासणी क्षमता ३४० इतकी आहे. तसेच एक टेस्ट करण्यासाठी ४५ मिनिटे वेळ लागतो. जीन एक्स्पर्ट मशीनसाठी लहान जागा पुरेशी असते. यामध्ये कार्ट्रिज वर (काढता घालता येणारे किट) आधारित टेस्ट प्रणाली असल्यामुळे अन्य कोणत्याही वस्तूंची आवश्यकता लागत नाही. यामध्ये विभाग स्वतंत्र असल्यामुळे वेगवेगळ्या चाचण्या एकाच वेळी केल्या जाऊ शकतात. या टेस्ट किमान प्रशिक्षण घेतलेले तंत्रज्ञ सुद्धा करू शकतात. यामध्ये सर्व चाचण्यांसाठी मानवी सहभाग न घेता नमुने भरण्याची सोय आहे. या मशीनवर एकाच वेळी कोविड १९ बरोबरच सामान्य टी.बी., एम.डी.आर.टी.बी., व स्वाईन फ्लु चीही तपासणी केली जाऊ शकते.

**२) आर. टी. पी. सी. आर कोविड – १९ तपासणी मशीन** :– हे मशीन आरटी–पीसीआर (रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेझ चेन रिॲक्शन) तंत्रज्ञानावर चालविले जाते. यासाठी विविध साधनांचा समावेश असणा–या किटची आवश्यकता असते. या मशीनमध्ये एका रन साठी ६ तास लागतात. एका रन मध्ये ३० टेस्ट होतात. तर दिवसातुन सरासरी ३ रन केल्या जाऊ शकतात. म्हणजेच दिवसाला ९० टेस्ट केल्या जाऊ शकतात. आर.टी.पी.सी.आर. मशीनसाठी नमुना तयार करण्यासाठी व एक्स्ट्रॅक्शन, प्री–पीसीआर, असे टप्पे विविध आहेत. यामध्ये प्रत्येक प्रकारच्या टेस्ट स्वतंत्रपणे वेगवेगळ्या कराव्या लागतात. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्गत डॉ. स्मिता देशपांडे ,डॉ. विजय कुलकर्णी , डॉ. वालावलकर हे मायक्रोबायोलॉजिक डिपार्टमेंट अंतर्गत या प्रयोगशाळेचे कामकाज पाहत आहेत. टेस्टिंग किट, साहित्य वेळेवर उपलब्ध करून देणे व समन्वयाचे काम अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उषा कुंभार पाहत आहेत.

कोरोनाला वेळीच रोखण्यासाठी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नव्यानेच कर्यान्वित झालेल्या दोन प्रयोगशाळामधून संशयितांच्या स्वॅबची कोव्हिड–१९ तपासणी वेळीच करुन कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास त्या रुग्णांवर प्रतिबंधक उपाययोजना व उपचार तात्काळ करणे आता सोईचे झाले आहे. कोव्हिड–१९ तपासणी लॅबच्या माध्यमातून नवीन सुविधा जिल्ह्याला उपलब्ध झाली असली तरीही कोरोनामुक्त जिल्हा व्हावा, यासाठी लोकांनी घरातच राहून शासनाच्या उपाययोजनांना सहकार्य करणे गरजेचे आहे.

**एस.आर.माने, कोल्हापूर**

# बोनसचे १०० कोटी अडकल्याने शेतकरी चिंतेत

**गोंदिया :** जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० क्विंटलपर्यंत बोनस देण्यात येणार होते. यात ५०० रुपये बोनस आणि २०० रुपये प्रती क्विंटल दरात केलेली वाढ असे एकूण ७०० रुपये बोनस मिळणार आहे. यातंर्गत शासकीय धान खरेदी केंद्रावर धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना आतापर्यंत ११३ कोटी रुपयांच्या बोनसचे वाटप करण्यात आले आहे. मात्र १०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त न झाल्याने बोनसचे वाटप रखडले आहे.

जिल्ह्यात खरीपात जिल्हा मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळातंर्गत हमीभावानुसार धान खरेदी केली जाते. ३१ मार्चपर्यंत जिल्ह्यातील एकूण ७० धान खरेदी केंद्रावरुन ३५ लाख क्विंटल धान खरेदी करण्यात आली होती. जिल्ह्यातील एकूण ९५ हजार ७३४ शेतकऱ्यांनी धानाची विक्री केली होती.

शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० क्विंटलपर्यंत ७०० रुपये प्रती क्विंटल प्रमाणे बोनस देण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. त्यानुसार जिल्ह्यातील एकूण ९५ हजार ७३४ शेतकऱ्यांना बोनसची रक्कम वाटप करण्यासाठी २१३ कोटी रुपयांच्या निधीची गरज होती.

यापैकी पंधरा दिवसांपूर्वी शासनाने ११३ कोटी रुपयांचा निधी जिल्हा मार्केटिंग फेडरेशनला उपलब्ध करुन दिला होता. त्यानंतर बोनसचा निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केला जात आहे. शेतकऱ्यांना



बोनस वाटप करण्यासाठी पुन्हा १०० कोटी रुपयांची गरज आहे. मात्र शासनाकडून मागील पंधरा दिवसांपासून हा निधी न मिळाल्याने जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना बोनस मिळण्याची प्रतीक्षा कायम आहे.एकीकडे लॉकडाऊन आणि संचारबंदी तर दुसरीकडे खरीप हंगाम तोंडावर असल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीची कामे करण्यासाठी पैशाची गरज आहे.त्यामुळे बोनसची रक्कम लवकर मिळाल्यास शेतकऱ्यांना तेवढीच मदत होणार असल्याने सर्व शेतकऱ्यांच्या नजरा सध्या याकडे लागल्या आहे.

**६ लाख बारदाना आला मात्र खरेदी सुरु होईना**

रब्बी हंगामातील धान खरेदी सुरू करण्याचे आदेश शासनाने दिले असून एकूण ७० धान खरेदी केंद्रावरुन खरेदी केली जाणार आहे. यासाठी जिल्हा मार्केटिंग फेडरेशनला ६ लाख बारदाना सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आला आहे. मात्र आदेशानंतरही बऱ्याच केंद्रावर धान खरेदी सुरू झाली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

**खरेदी केंद्रावर करावी लागणार जंतुनाशक फवारणी**

कोरोनाचा प्रादुर्भाव आणि धान खरेदी केंद्रावर शेतक?ऱ्यांची होणारी गर्दी लक्षात घेवून खबरदारीचा उपाय म्हणून खरेदी केंद्रावर दिवसांतून दोनदा जंतूनाशक फवारणी करण्याचे निर्देश शासनाने दिले आहे. तसेच खरेदी केंद्रावर सॅनिटायझरची व्यवस्था करण्याचे सूचना दिल्या.गर्दी टाळण्यासाठी टोकन पध्दतीने धान खरेदी करावी असे निर्देश सुध्दा जिल्हा प्रशासनाने सर्व खरेदी केंद्र संचालकांना दिले आहे.

# जिल्ह्यात मका खरेदी केंद्र सुरू होणार !

**अर्जुनी मोरगाव :** रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी मका पिकाची लागवड केली.पीक निघाले.मात्र आधारभूत हमी भाव मका खरेदी केंद्र सुरू झाले नसल्याने शेतकऱ्यांची पिळवणूक होत होती.यासंदर्भात जिल्हा परिषद सदस्य किशोर तरोणे यांनी पत्राद्वारे अन्न पुरवठा मंत्री,पालकमंत्री, खासदार प्रफुल पटेल व आ मनोहर चंद्रिकापुरे यांच्याकडे मागणी केली होती. त्या पत्राच्या आधारे आमदार चंद्रिकापुरे यांनी पालकमंत्री व खा. पटेल यांच्याकडे हा मुद्दा मांडल्यानंतर पालकमंर्त्यांनी खा.पटेलांच्या पत्रावरच त्यासंबधीचे निर्देश मार्केटिंग फेडरेशनला दिले होते.अखेर शासनाने जिल्ह्यात मका खरेदी केंद्राला मंजुरी दिल्याने शेतकरी वर्गात आनंद व्यक्त केला जात आहे.

शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी त्यांनी नगदी पिकाकडे वळावे असा सल्ला कृषी विभागाकडून दिला जायचा.मात्र धान उत्पादक शेतकरी सहसा पीक पद्धतीत बदल करण्याच्या मानसिकतेत नसतो.तरी सुद्धा अर्जुनी मोरगाव तालुक्यात सुमारे ५०० हेक्टर क्षेत्रात मका पीक लागवड करण्यात आली. पीक निघाले. मात्र आधारभूत हमी भाव खरेदी केंद्र सुरू झाले नाही.व्यापारी वाटेल त्या भावाने मका खरेदी करायचे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त होते. अनेक शेतकऱ्यांनी आ मनोहर चंद्रिकापुरे यांचेकडे धाव घेतली. त्यांनी आपले कर्तव्य पार पाडत अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचेशी यासंदर्भात बोलणी केली.ना भुजबळ यांनी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला.त्यांचेकडून परवानगी मिळाल्याने खरेदी केंद्र सुरूहोण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हे आदेश गुरुवारी निर्गमित होणार असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सहसचिव सुपे यांनी भ्रमणध्वनीवरून सांगितल्याची माहिती आ चंद्रिकापुरे यांनी दिली.

सुमारे १७६० रुपये प्रति क्विंटल मक्याला भाव असल्याची माहिती पुढे येत आहे.यामुळे निश्चितच शेतक?ऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.मका खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष लोकपाल गहाणे,किशोर तरोणे, अर्जुनी मोरगावचे नगराध्यक्ष किशोर शहारे, रतीराम राणे, पं.स. सदस्य सुशीला हलमारे,उद्धव मेहंदळे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष हेमकृष्ण संग्रामे, योगराज हलमारे,सोमा नरवास यांनी आ चंद्रिकापुरे यांचेकडे आग्रही भूमिका मांडली होती.

# लॉकडाऊनमध्ये एक विवाह असाही



**नवेगावबांध :** कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी सध्या सर्वत्र लॉकडाऊन व संचारबंदी लागू आहे. यामुळे विवाह सोहळे सुध्दा रद्द झाले आहे. तर आता जिल्हा प्रशासनाने वधू वराकडील ३० मंडळीच्या उपस्थितीत फिजिकल डिस्टन्स ठेवून विवाह करण्यास परवानगी दिली आहे. याच नियमाचे पालन करीत आणि मोजक्याच मंडळीच्या उपस्थितीत विवाह करुन वर वधूला घेऊन चक्क मोटारसायलनेच स्वगृही रवाना झाला. असा आगळा वेगळा विवाह सोहळा अर्जुनी मोरगाव तालुक्यातील परसोडी रयत येथे पार पडला.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील परसोडी रयत येथील तुलाराम भेंडारकर यांची कन्या रंगीता व सडक-अर्जुनी तालुक्यातील राका येथील रवींद्र फुंडे यांचा मुलगा मिथून यांचा विवाहपूर्वीच ठरला होता. ५ मे ला सायंकाळी सहा वाजून पंधरा मिनिटांचा शुभमुर्हूत निघाला होता. परंतु कोरोनामुळे राज्यात तिसऱ्या टप्प्यातील लॉकडाऊन १७ मे पर्यंत जाहीर करण्यात आले. त्यामुळे आता विवाह करायचा कसा? असा प्रश्न वर वधू पित्यांना पडला. रवींद्र फुंडे यांच्या मुलाचा परसोडी येथील वधूशी व मुलगी करिष्मा हिचा विवाह भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील सोनपुरी येथील जगन कठाणे यांचा मुलगा धनपाल यांच्याशी निश्चित झाला होता. मुलगा व मुलीचे लग्न ५ मे ला सायंकाळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राका येथे संपन्न होणार होते.

मुलाचा व मुलीचा लग्न सामाजिक रितीरिवाजाप्रमाणे धामधुमीत करण्याचा रवींद्र फुंडे यांचा विचार होता. परंतु त्यात कोरोनामुळे अडचण निर्माण झाली. त्यांनी प्रशासनाला परवानगी मागीतली असता वराच्या पक्षाकडील पाच व वधूकडील २० वऱ्हाड्याच्या उपस्थित विवाह पार पाडण्याची परवानगी दिली.५ मे ला सकाळी ११.०० वाजता पाच पाहुणे घेऊन वर मिथून आपल्या वडील रवींद्र फुंडे यांच्यासोबत मोटारसायकलवर स्वार होऊन वधू मंडपी परसोडी रयत येथे पोहचले. फिजिकल डिस्टन्स व मास्क लावून हा विवाह सोहळा पार पडला. विवाह संपन्न होताच तासभरानंतर मिथूनने लगेच मोटारसायकलवर आपली नववधू रंगीताला घेवून आपल्या राका गावाकडे रवाना झाला. तर त्याच दिवशी मिथूनची बहिण करिष्मा हिचा विवाह दुपारी ४ वाजता प्रशासनाने मंजुरी दिलेल्या मोजक्याच पाहुणे मंडळीच्या उपस्थितीत पार पडला. भावाची व्हिडिओ कॉलवरुन उपस्थितीकरिश्माचा भाऊ अजय हा मुंबईला नोकरीवर आहे. कोरोनामुळे सर्वत्र लॉकडाऊन आणि संचारबंदी लागू असल्याने त्याला बहिणीच्या विवाह सोहळ्याला प्रत्यक्षरित्या उपस्थितीत राहता आले नाही. त्यामुळे त्यांने व्हिडिओ कॉलवरुनच लग्न सोहळ्याला उपस्थितीत राहून व अक्षता टाकून बहिणीला आशिर्वाद दिले. दोन्ही लग्न समारंभाला जेवणाची व्यवस्था केलेली नव्हती. सर्व धामधूमीला फाटा देऊन, अगदी साध्या पद्धतीने फिजिकल डिस्टन्स ठेवीत मास्क लावून हा विवाह सोहळा पार पडला. मुलामुलीचे लग्न आधीच ठरले होते. लग्न समारंभासाठी किराणा, अन्नधान्य सर्व विकत घेतले होते. बॅन्ड, डेकोरेशन, आचारी यांना अॅडव्हान्स देखील देण्यात आले. परंतु कोरोना व्हायरसमुळे संचारबंदी व लॉकडाऊनमुळे थाटामाटात लग्न करता आले नाही. त्यामुळे वेळेचे भान ठेवून अगदी साध्या पद्धतीने विवाह सोहळा पार पाडला.


# कोरोनाविषयी सक्षम आरोग्य यंत्रणा करा-आ.चंद्रीकापुरे

**अर्जुनी मोरगाव:** गोंदिया जिल्हा कोरोना विषयक ग्रीन झोनमध्ये आहे. त्यात अर्जुनी-मोरगाव विधानसभा क्षेत्रात प्रादुर्भाव आढळला नाही. परंतु आता खरा धोका उत्तरार्धात असल्याने आरोग्य यंत्रणेनी सज्ज राहावेत. त्याचप्रमाणे सामाजिक जिवनात सोशल डिस्टसींग कायम ठेवण्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस विभागाने सुद्धा दक्ष राहण्याचे निर्देश अर्जुनी-मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहरराव चंद्रीकापुरे यांनी दिले आहे.

अर्जुनी-मोरगाव येथील उपविभागीय कार्यालयात कोरोना सांसर्गीक बिमारी विषयक आढावा सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी बोलताना आ.चंद्रीकापुरे म्हणालेत की कोरोना महमारीचे युद्धाचे सरतेनापती डॉक्टर, पोलीस व स्वच्छता कर्मचारी ठरले आहेत. आपल्या क्षेत्रात अद्याप महामारीचा शिरकाव झाला नसला तरी आपण सदैव सज्ज राहायला हवे. क्षेत्रात विविध ठिकाणी विलगीकरण कक्षाची निर्मिती केली असून त्यामध्ये साहित्य, वैद्यकीय उपकरणे अद्यावत ठेवावीत यासाठी आपण खासदार प्रफुल्ल पटेल, मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, राज्यमंत्री राजेश टोपे, आरोग्य सचिव व्यास यांच्याकडे मागणी केली असून वैद्यकीय अधिकारीचे रिक्त पदे भरण्यासाठी प्रयत्नरत असल्याचे सांगितलेत.

शनिवारपासून बसव्यवस्था सुरु झाली आहे. राज्यातील व राज्याबाहेरील शिक्षण, रोजगार व इतर कामाविषयक गेलेले आपल्या मुळगावी परत येत आहेत. त्यांची पहिल्यांदा आरोग्यविषयक तात्काळ माहिती घेवून शाळेत किंवा शक्य असल्यास घरीच विलगीकरण कक्षात ठेवावे. या रणसंग्रामात आपल्या ग्रामीण भागातील आंगणवाडी सेवीका, मदतनीस, आशा वर्कर, नर्स या सुद्धा रणयोद्धा ठरल्या आहेत. गावखेड्यात या गावातील बाहेरगवातून आलेल्या व्यक्तीची खडानखडा माहिती यंत्रणेला पुरवित असल्याने त्या अभिनंदनीय कार्य करीत असल्याचे म्हणालेत.

स्थलांतरण करुन इच्छिणाऱ्यांसाठी शासन बसव्यवस्था व इतर दळणवळणाची साधणे उपलब्ध करुन देणार आहे. व्यक्तीगत स्तरावर



शासनाच्या साईटवर ई-पास उपलब्ध असून ऑनलाईन अर्ज करावे यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र अधिकाऱ्यांनी द्यावे पोलीस व महसूल प्रशासनानी सुद्धा सहकार्य करण्याचे संबंधितांना निर्देश दिले. क्षेत्रामध्ये सद्य पिक काढणी मोठ्या प्रमाणात सुरु झाली आहेत.

क्रमाक्रमाणे बाजारपेठ सुद्धा खुली होत आहे. पुर्वीप्रमाणे सर्व व्यवहार सुरु होत आहेत. परंतु सामान्य नागरिकांनी सामाजिक अंतर कायम ठेवावे, प्रशासनाशी सलोखा कायम ठेवावा, गर्दी टाळावी.यावर्षी ऐन लग्नसभारंभाच्य वेळीच महामारीने उग्र रुप धारण केल्याने संपूर्ण जग थांबलेत. त्यामुळे शासकीय नियमांना कायम ठेवून ठरावीक लोकांमध्येच लग्न व इतर कार्य शासन नियमानुसार उरकवून टाकावेत.

श्रम, पैसा वेळेची बचत करण्याची सवय आता कायम करण्याचे आवाहन यावेळी आ.चंद्रीकापुरे यांनी केले. आढावा सभेला उपविभागीय अधिकारी शिल्पा सोनाले, तहसीलदार विनोद मेश्राम, नायब तहसीलदार गेडाम, वैद्यकीय अधीक्षक डॉ. घरतकर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय राऊत, गटविकास अधिकारी अंदेलवाड, न.प.च्या मुकाअ बगळे, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष लोकपाल गहाणे, उध्दव मेहेंदळे, रतीराम राणे, राकेश जायस्वाल, योगीराज हलमारे, सोमा नरवास व इतर उपस्थित होते.

## ऑनलाईन शिक्षण ३० टक्क्यांसाठी ७० टक्के विद्यार्थ्यांचे काय?

**गोंदिया :** संपूर्ण जगावर कोरोनाने थैमान घातला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थी पालक शिक्षक संकटात आले आहेत. कोरोनाचे संकट कधी संपते याची सर्वजण वाट बघत आहेत. अशीच परिस्थिती कायम राहिली तर देशातील शिक्षणाचे काय होणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ऑनलाईन शिक्षण हा एक पर्याय म्हणून समोर येत आहे.

ऑनलाईन शिक्षणाला भरपूर मर्यादा आहेत. ऑनलाईन शिक्षण केवळ ३० टक्केच विद्यार्थ्यांपर्यंत पोहचू शकेल. उर्वरीत ७० टक्के विद्यार्थ्यांचे काय? त्यांनी शिकायचे नाही का? असा सवाल शिक्षक भारतीचे विभागीय अध्यक्ष प्रकाश ब्राम्हणकर यांनी केला आहे. कोरोना होऊ नये अशी काळजी घ्यायला हवी, लॉकडाऊन नंतरही सर्वांना या आजाराशी सामना करायचा आहे. त्याची तयारी आपण करायला हवी. जसे मास्क वापरणे, सोशल डिस्टन्सिंग ठेवणे, सॅनिटायझरचा वापर करणे आदी गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. अशीच परिस्थिती कायम राहिली तर देशातील शिक्षणाचे काय होणार ऑनलाईन शिक्षण हा एक पर्याय म्हणून समोर येत आहे. ऑनलाईन शिक्षणाला भरपूर मर्यादा आहेत. ऑनलाईन शिक्षण केवळ ३० टक्केच विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकेल. उर्वरीत ७० टक्के विद्यार्थ्यांचे काय? त्यांनी शिकायचे नाही का? राज्य शासनाने ऑनलाईन शिक्षणाबाबत नुकतेच परिपत्रक काढले आहे.

# बुद्ध जयंती निमीत्त संविधान मैत्री संघाचा ऑनलाइन उपक्रम “बुद्धा आले दारी”



**गोंदिया:-** बुद्ध जयंती निमीत्त संविधान मैत्री संघ, सर्व समाज समिती व समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने “बुद्धा आले दारी” हा ऑनलाइन उपक्रम सोत्साह सम्पन्न झाला. शनिवार दि.२५ एप्रिल पासुन ७ मे पर्यंत घेण्यात आलेल्या या उपक्रमामध्ये सोशल मीडिया वर, संविधान मैत्री संघाच्या फेसबुक ग्रुप वर बुद्ध विचारांच्या माध्यमातून घरोघरी जागृती करण्यात आली. बुद्ध जीवन चरित्र माहिती, बुद्ध संदेश, धम्म देषणा, बुद्ध बोध कथा, बुद्ध गीत, बौद्ध चर्चा, रंगोली, चित्रकला, व्यवस्थापन सजावट असे विविध कार्यक्रम धम्मगुरु, विचारवंत, उपासक- उपासिका, अनुयायी, विद्यार्थ्यांकडुन ऑनलाइन सादर करण्यात आले.

व्हाट्स ऐप्प करिता भगवान बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन प्रसंगावर प्रश्नोत्तरी कार्यक्रम नागपुरचे भदंत डॉ.चंद्रकीत्ती यानी सादर केले. या कार्यक्रमात प्रतिभागिना सहभाग पूर्णत: नि :शुल्क होता. या ऑनलाइन उपक्रमात सहभागी झालेल्यात वसंता गवळी, सतिश बनसोड, उमाताई गजभिये, पौर्णिमाताई नागदेवे, शरद मानकर सर, सुनंदा रामटेके, ज्वाला मेश्राम, लक्ष्मी राऊत, समता गणवीर, प्रणाली मून, लीला राऊत प्रतिमा रामटेके, शृष्टी सोनवाने, लोपामुद्रा शहारे, पल्लवी चौहान, प्रगती मेश्राम, सतिश वानखेडे, वीणा गणवीर, सुरभी खोब्रागडे, सनोज उके,स्वाती मेश्राम,विक्की रामटेके मौसम कापसे, वंदना वाहने, निकिल मेश्राम, करण मानेकर, आकांक्षा वासनीक, अर्चना सतदेवे, पल्लवी मेश्राम, प्रतिक रामटेके, प्रणालि चौहान, सुरेंद्रकुमार खोब्रागडे, अशोक बागुल, शालू मेश्राम उज्वला चन्द्रिकापूरे, नम्रता गजभीये, निर्मला मेश्राम, ज्योती फुले,अनिता मेश्राम व अन्य उपासकानी ऑनलाइन सहभाग घेतले. सर्वाना लॉकडाउन नंतर पूरस्कृत करण्यात येणार आहे. जिल्यात यंदा घरिच सादगीने जयंती साजरी करण्यात आली। या वर्षी लॉकडाउन चे पालन करून बुद्ध विहारात कार्यक्रम घेण्याचे टाळण्यात आले.

हा आयोजन यशस्वी व्हावा या करिता संविधान मैत्री संघाचे संयोजक अतुल सतदेवे, सर्वसमाज जयंती समिती समिती संयोजक पुरुषोत्तम मोदी, सहसंयोजक अबरार सिद्दिकी, कोषाध्यक्ष डॉ राजेन्द्र वैद्य, स्वागत प्रमुख सुनिल भोंगाडे, रवि भांडारकर, सचिव प्रकाश तांडेकर, सहसचिव परेश दुरुगवार, कार्यालयीन सचिव सुरेंद्र सोनवाने, संघटक राजु नागरीकर, उमेश दमाहे दिनेश उके, अनिल गोंडाने, सांस्कृतिक प्रमुख चित्रा पाटील, आभा मेश्राम, संघटीका डॉ प्रा.दिशा गेडाम, माधुरी भेलावे, पौर्णिमा नागदेवे, नगमा शेख, संचालक मंडल मुख्याध्यापिका उमा गजभिये, माधुरी पाटील, राजकुमारी कठाने, लक्ष्मी राऊत, युवा मंडल आदेश गणवीर, सायमा खान, मीलन चौधरी, अरुण बन्नाटे, सलाहकार मंडल डॉ नामदेव किरसान, शब्बीर पठाण, वसंता गवली, महेंद्र कठाने, सैय्यद कमर अली, सी.पी.बिसेन, राजहंस चौरे इत्यादींनी प्रयास केला.

# भाजप महिला मोर्चाचे निवेदन
# जिल्ह्यात दारुविक्री त्वरित बंद करा



**गोंदिया :** कोरोना विषाणूची खबरदारी म्हणून देशासह राज्यात लॉकडाऊन सुरू होते. या अवधीत अतिआवश्यक सेवा वगळता सर्वच प्रतिष्ठाण बंद करण्यात आली होती. दरम्यान तंबाखुजन्य पदार्थ व दारूविक्री प्रतिबंधित करण्यात आली होती. मात्र, जिल्ह्याचा ग्रीन झोनमध्ये समावेश होताच शासनाने दारूविक्रीला परवानगी दिली. यामुळे आधिच संकटात सापडलेल्या मध्यमवर्गीय कुटूंबाना अडचणीचा सामना करावा लागत आहे. तर गर्दी होत असल्याने विषाणू संसर्गाचा धोका वाढला आहे. त्यामुळे शासनाने तत्काळ दारूविक्री बंद करावी, अशी मागणी भाजप महिला मोर्चाच्या वतीने करण्यात आले. या संदर्भात उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

कोरोना विषाणु मुळे देश व राज्यात संचारबंदी सुरू आहे. यामुळे अनेकांचे हातातील रोजगार गेले. व्यवहार ठप्प पडल्याने त्याचा परिणाम जनजीवनावर पहावयास मिळत आहे. परिस्थिती सावरण्यासाठी शासनाने काही बाबतीत मुभा दिली. व्यवहार सुरु होत नाही की, प्रतिबंधित असलेली दारूविक्री पुन्हा सुरू करण्याची परवानगी देण्यात आल्याने मध्यमवर्गीय कुटूंब अडचणीत आले आहेत. आधिच रोजगार नसलेले दारूच्या व्यसनापायी अशांतता पसरविण्याची शक्यता आहे. करीता लॉकडाऊन असेपर्यत दारूविक्री बंद करण्यात यावी, अशी मागणी भाजप महिला मोर्चाच्या वतीने करण्यात आले. या संदर्भात निवेदन जिल्हाध्यक्ष भावना कदम यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले. यावेळी प्रसिद्धी प्रमुख शालिनी डोंगरे, नगरसेविका अॅड. हेमलता पतेह, नगरसेविका मैथूला बिसेन उपस्थित होते. विशेष म्हणजे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अॅड.माधवीताई नाईक, प्रदेश सचिव सितातार्इ रहांगडाले, प्रदेश सदस्य रचनाताई गहाणे, सविता पुराम यांच्या निर्देशान्वये गोंदिया जिल्ह्यातील तालुकास्तरावर भाजप महीला मोर्चाच्या वतीने दारूविक्री बंद करण्यात यावी, यासाठी तहसीलदारांना निवेदन दिले जात आहे.

# वीज बिल भरण्यासाठी आरटीजीएस व एनईएफटी ची सुविधा

**गोंदिया :** घरगुती ग्राहक व को-ऑपरेटीव्ह हाऊसींग सोसायट्यांसह ग्राहकांना १० हजारांपेक्षा अधिक वीजबिल भरण्यासाठी महावितरणकडून ऑनलाईनसोबतच आता ङ्गआरटीजीएस व एनईएफटीफ ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महावितरणच्या ग्राहकांना वीजबिलांची रक्कम भरण्यासाठी ऑनलाईनची सोय असली तरी प्रामुख्याने धनादेशाद्वारे भरण्यात येते. मात्र कोरोनामुळे सध्या लॉकडाऊन सुरु आहे. त्यामुळे बँकींग व्यवहारांवर परिणाम झाला आहे. ही अडचण लक्षात घेऊन महावितरणने १० हजार रुपयांपेक्षा अधिक वीजबिल भरण्यासाठी आरटीजीएस व एनईएफटी ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासोबतच सिंगल किंवा थ्री फेज घरगुती वीजग्राहकांनाही आता १० हजारांपेक्षा अधिक वीजबिलांची रक्कम या प्रणालीद्वारे भरता येईल.

यासोबतच सर्वच प्रकारच्या ग्राहकांसाठी ऑनलाईनद्वारे क्रेडीट कार्ड, नेटबॅकिंग, डेबीटकार्ड, गुगल पे, कॅशकार्ड, यूपीआय, डिजिटल वॉलेट आदींद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा सुरु राहणार आहे.

घरगुती ग्राहक व को-ऑपरेटीव्ह हाऊसींग सोसायट्यांसह ग्राहकांना १० हजारांपेक्षा अधिक रकमेचा आरटीजीएस व एनईएफटी द्वारे भरणा करण्यासाठी त्यांच्या वीजबिलांवर महावितरणच्या बँक खात्याची माहिती देण्यात येत आहे. संबंधित ग्राहकांना ङ्गआरटीजीएस व एनईएफटीफचा अर्ज महावितरणने दिलेल्या व्हर्चूल बँक खात्याची माहिती त्यांच्या बँकेत देऊन या सुविधेचा लाभ घेता येईल. तसेच वीज बिलावर असलेल्या बँकेच्या खाते क्रमांकावरच ग्राहकांना वीजबिल भरावे लागणारआहे.

ङ्गएसएमएसफ द्वारे थेट पेमेंट लिंक -* घर बसल्या वीजबिलांचा ऑनलाईनद्वारे भरणा करण्यासाठी महावितरणकडून लघुदाब वीजग्राहकांना ङ्गएसएमएसफ द्वारे थेट पेमेंट लिंक पाठविण्यात येत आहे. नोंदणीकृत मोबाईल धारक वीजग्राहकांना वीजबिलाची रक्कम, देय दिनांक आदींसह पेमेंट लिंकसुद्धा पाठविण्यात येत आहे. या लिंकद्वारे संबंधीत ग्राहकांना स्वतःचे वीजबिल ऑनलाईनद्वारे थेट भरण्याची सोय आहे. ज्या वीजग्राहकांनी अद्यापही ग्राहक क्रमांकासोबत मोबाईल क्रमांकाची नोंदणी केलेली नाही त्यांनी नोंदणी करावयाच्या मोबाईल क्रमांकावरून ९९३०३९९३०३ क्रमांकावर MREG (स्पेस) (बारा अंकी ग्राहक क्रमांक) अशी माहिती टाईप करून एसएमएसफकरावा. याशिवाय www.mahadiscom.in या संकेत स्थळावर किंवा महावितरणफ मोबाईल अॅपद्वारे मोबाईल क्रमांक नोंदणी करण्याची सोय उपलब्ध आहे. तरी ग्राहकांनी वरील सुविधेचा लाभ घेवून विजबिलाचा भरणा करावा. असे आवाहन गोंदिया परीमंडळातर्फे करण्यात येत आहे.



# कृषी पंपांसाठीचे नवीन वीज जोडणी धोरण लवकरच-ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत

**मुंबई :** कृषी पंपांसाठीचे मार्च २०१८ पासून प्रलंबित असलेले नवीन वीज जोडणी धोरण लवकरात लवकर अंतिम करण्याच्या सूचना ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत यांनी आज प्रशासनाला दिल्या.

यासंदर्भात व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आलेल्या प्रदीर्घ बैठकीमध्ये या विषयावर सविस्तर चर्चा झाली. मार्च २०१८ पर्यंत सुमारे ५० हजार कृषीपंप धारकांनी वीज जोडणीसाठी महावितरणकडे पैसे भरलेले आहेत तर सुमारे दीड लाख कृषी पंप धारकांनी नवीन वीज जोडणीसाठी रितसर अर्ज भरलेले असून त्यावर धोरणाअभावी कोणतीही कार्यवाही झालेली नाही. याबाबत राज्यातील शेतकऱ्यांकडून वारंवार विचारणा होत असून विधानमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात चर्चा होऊन लवकरात लवकर धोरण करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुषंगाने डॉ.नितीन राऊत यांनी या विषयावर धोरण प्रस्तावित करण्याच्या सूचना विभागाला दिल्या होत्या.

प्रस्तावित धोरणामध्ये १०० मीटर पेक्षा कमी अंतर असलेल्यांना लघूदाब वाहिनीवरून तर १०० ते ६०० मीटर अंतर असलेल्या कृषी पंपाना उच्च दाब प्रणाली वरून वीज जोडणी प्रस्तावित केली आहे. या शिवाय ६०० मीटर पेक्षा अधिक अंतर असलेल्या कृषी पंप धारकांना सौर उर्जा संयंत्र पुरवठा करण्याचे प्रस्तावित केले आहे. एकाच वेळी पारंपरिक व सौर उर्जा या अपारंपारिक स्त्रोताद्वारे वीज जोडणी प्रस्तावित आहे. तसेच अशी नवीन जोडणी करतांना कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग तसेच अन्य विभागाशी समन्वय करून हे धोरण सर्वकष कसे होऊ शकेल याबाबत संबंधित विभागाशी सल्ला मसलत करून धोरण अंतिम करावे व तसेच याबाबत आवश्यकतेनुसार सर्व संबधित विभागांसह क्षेत्रिय स्तरावर संबंधित विभागांसमवेत समन्वय साधून सर्वेक्षण करण्याच्या सूचना डॉ.नितीन राऊत यांनी दिल्या.

यावेळी ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता आणि महावितरणचे सर्व संचालक सहभागी झाले होते.

# गोंडवाना विद्यापीठाची पदभरती रद्द करुन उच्चस्तरीय चौकशी करा-राष्ट्रीय ओबीसी महासंघ

**गडचिरोली:** गोंडवाना विद्यापीठाने प्राध्यापकांच्या ३६ रिक्त पदासाठी लॉकडाउन काळात २० मार्च २०२० रोजी जाहिरात प्रकाशित करुन ११ मे २०२० पर्यंत ऑनलाईन अर्ज मागितले आहेत. परंतु राज्यात १९ टक्के आरक्षण असणाऱ्या ओबीसी समाजाला मात्र एकही जागा नसल्याने ओबीसीमध्ये रोष निर्माण झाला आहे. विद्यपीठाचा प्राध्यापकांच्या पदांना विभागनिहाय आरक्षण लागू आहे. त्यामुळे ही पदे छोट्या संवर्गात मोडतात. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार २७ जून २०१९ रोजी सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाला (एसईबीसी) सरळसेवा पदभरतीमध्ये १३ टक्के आरक्षण लागू केले. न्यायालयाच्या या निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाने ४ जुलै २०१९ रोजी आधारित १०० बिंदूनामावली जाहिर केली. परंतु या बिंदू नामावलीनुसार विभागनिहाय आरक्षण, निर्धारित करता येत नाही. त्यामुळे हे शासननिर्णय विद्यापीठाय प्राध्यापकांच्या पदभरतीसाठी लागू होत नाही. शासनाच्या हे लक्षात येताच शासनाने छोट्या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी २१ ऑगस्ट २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केला. परंतु त्याला दुसऱ्याच दिवशी म्हणजेच २२ ऑगस्टला सामाजिक न्याय विभागाने स्थगिती दिली व यी आजतागायत कायम आहे. म्हणजेच आजच्या तारखेला विद्यापीठीय प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी कोणताही शासन निर्णय अस्तित्वात नसताना गोंडवाना विद्यापीठाला प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याची परवानगी शासनाने कोणत्या जीआरच्या आधारे दिली आहे ही जिल्ह्यातील जाणकारांना बुचकाड्यात टाकणारी व संशय मिर्माण करणारी बाब आहे. म्हणून गोंडवाना विद्यापीठाला प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडून मिळालेल्या परवानगीची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी तसेच ही पदभरती प्रक्रिया राबवावी अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.शेषराव येलेकर, जिल्हाध्यक्ष दादाराव चुधरी, कार्याध्यक्ष विनायक बांबूरकर, सचिव प्रा.देवानंद कामडी यांनी निवासी उपजिल्हाधिकारी धनाजी पाटील यांच्यामार्फत राज्यपालांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे. तसेच सदर पदभरती लॉकडाऊन काळात सुरु केल्यामुळे देशातील बहुसंख्य पात्र उमेदवारांना वंचित ठेवणारी आहे असेही निवेदनातून म्हटले आहे.

**परभरती रद्द करुन नव्याने प्रक्रिया राबविण्यासाठी प्रयत्न करणार-पालकमंत्र्यांचे आश्वासन**

नुकतेच जिल्ह्याचे पालकमंत्री विजय वडेट्टीवार जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना ओबीसी शिष्टमंडळाने त्यांची भेट घेवून सदर समस्या त्यांना समजावून सांगण्यात आली. यावेळी मंत्री महोदयांनी सदर परभरती प्रक्रिया रद्द करुन नव्याने पदभरती प्रक्रिया (सुधारित बिंदू नामावलीसह) राबविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

# दुधात भेसळ अन.शेतकऱ्यावरील अन्याय खपवून घेणार नाही-ना.केदार



**गोंदियाः** जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता आजपासून दुध खरेदी केंद्र सुरु करण्यात येत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या केंद्रावर उत्तम दर्जाचे दूध विक्रीसाठी आणावे. शासकीय दूध खरेदी केंद्रावर भेसळयुक्त दूध स्वीकारले जाणार नाही. दुधात भेसळ आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.ज्या दूध संकलन केलेल्या शेतकऱ्यांचे पैसे थकीत आहे,त्या शेतकऱ्यांचे पैसे लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न राहणार आहे. शासकीय दूध खरेदी केंद्रावर सोलर पॅनल लावून विजेचा खर्च कमी करावा. येथील शासकीय दूध खरेदी केंद्राची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यासाठी सर्व दुध उत्पादक शेतकऱ्यांचे सहकार्य अपेक्षित असून हे शासकीय दूध खरेदी केंद्र सुरू झाल्याने याचा लाभ जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

गेल्या काही वर्षापासून शेतकर्यांचे दुधाचे पैसे संघाने दिलेले नाहीत हे योग्य नसून तत्काळ तो पैसा शेतकर्याला मिळाला पाहिजे.मी कुठल्याही प्रकारचे भेसळ आणि शेतकयावरील अन्याय खपवून घेणार नाही अशा स्पष्ट शब्दात राज्याचे दुग्धविकास व पशुसंवर्धन मंत्री सुनिल केदार यांनी विचार व्यक्त केले.

जिल्ह्यातील शासकीय दुध संकलन केंद्र सातगाव, कोहमारा व गोंदिया याठिकाणाहून गेल्या गेल्या डिसेंबर महिन्यापासून दुध संकलन बंद असल्याने ते बंद पडले होते.त्या बंद संकलन केंद्रापैकी गोंदियातील संकलन केंद्राचा पुर्नःशुभारंभ कार्यक्रम (दि.११) राज्याचे पशु व दुग्धविकास मंत्री सुनिल केदार यांच्या हस्ते करण्यात आले,त्याप्रसंगी ते बोलत होते. कुडवा येथील शासकीय दुध संकलन केंद्राच्या शुभारंभप्रसंगी जिल्ह्याचे खासदार सुनिल मेंढे,आमदार विनोद अग्रवाल, आमदार मनोहर चंद्रीकापुरे, आमदार सहसराम कोरेटे, भंडारा जिल्हा मध्यवती बँकेचे अध्यक्ष सुनिल फुंडे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष पुरुषोत्तम कटरे, डॉ.झामसिंह बघेले, माजी जि.प. अध्यक्ष उषा मेंढे, माजी सभापती पी.जी.कटरे, दुग्ध संघाचे अध्यक्ष राजकुमार कुथे, संचालक पंकज यादव, डॉ.लक्ष्मण भगत यांच्यासह प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी हेमंत गडवे, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी डी. आर.लाखे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. संजय गायगवळी, जिल्हा पशुसंवर्धन विकास अधिकारी डॉ.राजेश वासनिक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



यावेळी त्यांनी जिल्हा दुग्ध संघ व शासकीय दुध शितकरण केंद्रातील अधिकारी व पदाधिकारी यांच्याशी चर्चा केली.जिल्हा दुग्ध संघाचे अध्यक्ष राजकुमार कुथे यांनी यावेळी आपल्या मागण्याचे निवेदन सादर केले.त्यावेळी उपस्थित दुग्धसंघाच्या प्रभारी व्यवस्थापक श्रीमती बोकडे यांना खर्चावर काटकसर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.शासकीय दरापासून ५ रुपये दर कमी दिल्याचा मुद्दा उपस्थित करुन दुध उत्पादक शेतकर्यांनी दुध संघाकडे असलेल्या सव्वा कोटी रुपयाची थकबाकी मिळवून देण्याची मागणी परस बसेने, सचिन अवस्थी,मयाराम दसरे यांनी मंत्र्याकडे केली.त्यावर मंत्री केदार सुध्दा अचबिंत झाले.आपणास दिलेल्या माहितीपत्रकात या थकबाकीचा उल्लेख का केला नाही अशा शब्दात जिल्हा दुग्धविकास अधिकार्याला खडसावत सविस्तर माहिती देण्याचे निर्देश दिले. आमगाव, देवरी व सालेकसा तालुक्यातील दुध गोंदियातील शीतकरण केंद्रात आणणे परवडणारे नसल्याने सातगाव येथील शासकीय दुध संकलन व शितकरण केंद्र सुरु करुन तिथे स्विकारण्याची मागणी त्या पुरुषोत्तम कटरे,पंकज यादव,राजु काळे आदींनी केली.

### गुणवत्तापुर्ण दुधच स्विकारणार-सुनिल फुंडे

गोंदिया जिल्हा दुध संघाच्यावतीने आजपासून जे दुध संकलन करुन भंडारा येथील दुध संघाला पावडर तयार करण्यासाठी पाठविण्यात येईल त्या दुधाची गुणवत्ता असेल तरच आम्ही तो स्विकारु अन्यथा तो दुध परत करणार अशा कडक शब्दात सांगितले. त्याकरीता दुध संकलित करतांना गुणवत्तापुर्ण दुध स्विकारण्यासोबतच दुधासाठी वापरण्यात येणारे सध्याचे सर्व कॅन तत्काळ बंद करुन नव्या कॅनचा वापर करण्याच्या सुचना भंडारा जिल्हा मध्यवती बँकेचे संचालक व भंडारा जिल्हा दुग्ध सहकारीसंघाचे मार्गदर्शक संचालक सुनिल फुंडे यांनी केल्या.

# कोरोनाचे संक्रमण रोखण्यासाठी उपाययोजना करा-खासदार अशोक नेते



**आमगावः-** गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार अशोक नेते यांनी ११ मे रोजी आमगाव तालुक्याचा दौरा करुन कोरोना संक्रमण रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाचा व विविध विकास कामांचा आढावा घेतला.

यावेळी खासदार अशोक नेते यांनी कोरोना या आजारावर मात करण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहून लॉकडाऊन कालावधीत नियमांची काटेकोरपणे अमलबजावणी व पालन करून परराज्यातून किंवा जिल्हाबाहेरून येणाऱ्या नागरिकांची माहिती ठेवून त्यांना गावाबाहेर कारंटाईन करून त्यांची आरोग्य तपासणी करण्याच्या सूचना अधिका?यांना केल्या.

या आढावा बैठकीला आमगाव- देवरी विधानसभा चे माजी आमदार केशवराव मानकर, माजी आमदार भेरसिंगजी नांगपुरे, माजी आमदार संजयजी पुराम,डॉ भारत खटी, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र नायडू, राकेश शेंडे, राजूभाऊ पटले, यशवंत मानकर, भाजयुमोचे प्रदेश सदस्य हितेश डोंरगरे, पिंटूभाऊ अग्रवाल, आमगाव तहसीलदार डी.एस.भोयर,बीडीओ चंद्रकांत सावळे, ठाणेदार शामराव काळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.भुमेश्वर पटले, तालुका कृषी अधिकारी, सार्व. व जिप बांधकाम तसेच सिंचन विभागाचे कार्यकारी / उपअभियंता व इतर विभागाचे अधिकारी, कर्मचारी या आढावा बैठकीला प्रामुख्याने उपस्थित होते.

# सरिताने स्वीकारले अनाथ बालकांचे पालकत्व..

**गोंदिया :** प्रत्येकाच्या वाट्याला आयुष्यात सुखाचे क्षण येतीलच असे नाही. क्षणो क्षणी काटेरी पाऊल वाटेने आयुष्यभर एखाद्याला मार्गक्रमण करावे लागते. सुखद आनंदी हसतं-खेळतं ना कुणाला बालपण लाभत ना कुणाला तरुणपण लाभतं. पण विक्राळ परिस्थितीवर मात करत येणा?या दिवसावर जे आपले नाव गोंदवितात त्याचीच इतिहास दखल घेते. आई-वडिलांचे छत्र हरपल्याने स्वत: अनाथ झालेल्या सरिताने तीन बालकांना दत्तक घेवून समाजपुढे नवा आदर्श ठेवला आहे.आमगाव तालुक्यातील सुपलीपार येथील एक दहा वर्षाची एक ९ वर्षाची तर एक ४ वर्षाची मुलगी ती स्वत: च्या मुलीबरोबर सांभाळते. तथागत हा केवळ भाषणाचा विषय नाही तर जगण्याचा विषय आहे हे या मातृवत्सल तरुणींने ते दाखवून दिले.

मदर्स डे च्या निमित्ताने अशाच एका संघर्ष नायिकेचा काहणी. ही आहे सरिता बालकदास गजभिये, तालुक्यातील आसोली येथील मुलगी. २००५ मध्ये बालपणीच तिच्या वडिलाचा मृत्यू झाला. आईच्या छत्रछायेत हे तिन्ही भावंडे जगत होती. पण नियतीला ते देखील मान्य नव्हते.

आईला कॅन्सर झाला असे निदान झाले आणि या तिन्ही भावंडांच्या पायाखालची वाळू सरकली. औषधासाठी पैसा नाही. वेदनेने आईचे विव्हळने हे तिन्ही भावंडे अगतिकपणे पहात होते. रोजचे बाराशे रुपये आईला इंजेक्शन देण्यासाठी लागेल. काय करावं सर्वात मोठी असलेल्या सरिता समोर प्रश्न उभा झाला. आईला तिने जीवाचा आटापिटा करीत वाचिवण्याचा प्रयत्न केला. सर्व मार्ग बंद झालेले दिसले म्हणून तिने काबाळ कष्ट करुन आईच्या इंजेक्शनसाठी बाराशे रुपये ती देऊ लागली. यानंतरही ती आईला वाचवू शकली नाही. ३१ मार्च २०१३ ला तिच्या आईचा कॅन्सरने मृत्यू झाला. दुर्दैवाचे दशावतार कमी होते की काय तिचं घर पडलं. त्या गावच्या शिक्षकांनी या भावंडांना सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सविता बेदरकर(भुरले) यांच्याकडे पाठविले.



या घटनेला आता चार-पाच वर्षे लोटली. सरिताच घर बांधण्यासाठी बेदरकर यांनी जिथून जमेल तिथून मदत मिळवू देण्याचा प्रयत्न केला.अशात त्यांनी जमीन विकली आणि सरिताला घर बांधण्यासाठी दहा हजार रुपये रोख आणि तीन ट्रॉली विटा आणि रेतीची मदत केली. त्यानंतर कशा बश्या घराच्या चार भिंती उभ्या राहिल्या. त्यानंतर घरावर स्लॅब टाकण्यासाठी पुन्हा बेदरकर यांनी २५ हजार रुपयांची मदत केली. त्यामुळे सरिताच घर तयार झाल. मात्र तोपर्यंत सरिताचे लग्नाच वय येऊन ठेपलं होतं. शेवटी घराजवळच्याच एका मुलाने तिला मागणी घातली.

सविता बेदरकर यांनीच पुढाकार घेवून तिचे लग्न लावून दिले. लग्न झाल्याबरोबर एम. एस. डब्ल्यूला ॲडमिशन केलं. त्याचबरोबर इंडस प्रोजेक्टमध्ये तिला नोकरीला लावून दिले.आज ती एम.एस.डब्ल्यू.टॉपर आहे. तिचा भाऊ बादल ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये लागलाय. आता त्याचे लोको पायलेटमध्ये सिलेक्शन झाले. आज सरिता एका मुलीची आई आहे.सुखाचा तिचा संसार संसार फुलला आहे. तिने नेट सेटची परीक्षा दिली.

महिला बाल विकास अधिकाऱ्याची परीक्षा दिली. सध्या तिचा निकाल यायचा आहे. एक ना एक दिवस ती क्लास वन अधिकारी झाल्याशिवाय राहणार नाही कारण तिच्यात जिद्द आहे, स्वाभिमानी असल्याचे विचार सामाजिक कार्यकर्त्या डॉ.सविता बेदरकर यांनी म्हटले आहे.

# एसडीओंच्या पुढाकाराने कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

**गोंदियाः-** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महसुल विभागासह इतर विभागात कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांची आरोग्य तपासणी शिबिर सोमवारला (दि.११) उपविभागीय अधिकारी कार्यालय व होमियोपॅथी वैद्यकीय महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमानाने घेण्यात आले.या आरोग्य शिबिराला उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते,होमियोपॅथी महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ.राध्येश्याम (बबली) अग्रवाल, डॉ.बी.एन.वारजुरकर, डॉ.रोशन कानतोडे, डॉ.हर्षा कानतोडे, डॉ.सपना पटले,डॉ.इल्तियाषा गुप्ता आदी उपस्थित होते.

उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांनी जयस्तंभ चौकातील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये असलेल्या महसुल विभागासह सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्याचा निर्णय घेतला.त्यासाठी श्रीमती सवरंगपते यांनी होमियोपॅथी महाविद्यालयचे संस्थापक प्राचार्य डॉ.राधेश्याम (बबली)अग्रवाल यांच्याशी संपर्क साधून सहकार्य करण्याची विनंती केली.त्यावर अग्रवाल यांनी आपल्या वैदयकिय महाविद्यालयाची चमू आज सकाळपासूनच डॉ.रोशन कानतोडे यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय अधिकारी कार्यालयात उपलब्ध करुन दिल्याने आरोग्य तपासणीला सुरवात झाली आहे.

या आरोग्य तपासणीमध्ये सर्व कर्मचारी यांची स्क्रिनींग करुन त्यांना तीन दिवसाचे केंद्रसरकारच्या आ?ुष विभागाच्यावतीने तयार करण्यात आलेले औषध निशुल्क देण्यात येत आहे. कोरोनाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासन कठोरपणे उपाय योजना करत आहे. यासाठी सर्वच कर्मचारी २४ तास सेवेत असतात. यावेळी त्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.आरोग्य शिबिरासाठी वैद्यकिय महाविद्यालयाचे व उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे कर्मचारी यांनी सहकार्य केले.



# कोविड केअर कक्षात शिक्षकांना डुलकी, तिघांवर गुन्हे दाखल

**मोहाडी-**कोरोना प्रादुर्भावाच्या नियत्रणासाठी तालुकास्तरावर तयार करण्यात आलेल्या कोविड केअर कक्षात कर्तव्यावर असलेले शिक्षक झोपा काढताना आढळून आले. तर एक कर्मचारी गैरहजर आढळून आला. याप्रकरणी तिनही कर्मचाऱ्यांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. हा प्रकार मोहाडी येथील महिला आर्थिक विकास महामंडळातील कोविड केअर कक्षात रविवारी घडला.

मोहाडी तालुक्यातील कोरोना विषाणुच्या रुग्णांना तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच सदर आजाराचे नियंत्रण व उपाययोजना करण्यासाठी घरोघरी प्रत्यक्ष भेटी देऊन जनजागृती करण्यासाठी तलाठी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका व आशा सेविका यांची गावनिहाय समन्वय समिती आणि पथक गठीत करण्यात आले आहे.

या भेटीदरम्यान कोरोना संशयित रुग्ण आढळल्यास अशा रुग्णांची व्यवस्था महिला आर्थिक विकास महामंडळाच्या इमारतीतील कोरोना केअर कक्षात करण्यात आली आहे.

१० मे रोजी या केअर सेंटरमध्ये दुपारी २ ते रात्री १० वाजतापर्यत जिल्हा परिषद हायस्कुल करडीचे शिक्षक एस.डी. आडे, जिल्हा परिषद हायस्कुल आंधळगावचे शिक्षक बी.ए. गजभिये व नियंत्रण अधिकारी म्हणून मोहाडी पंचायत समितीचे अधिकारी आर.बी. दिपटे यांची नेमणूक करण्यात आली होती. तथापि, मोहाडीचे तहसीलदार धनंजय देशमुख यांनी या केअर सेंटरमध्ये जाऊन आकस्मिक तपासणी केली असता एस.डी. आडे व बी.ए. गजभिये हे शिक्षक क्वारंटाईन कक्षामध्ये झोपलेले दिसून आले. तर नियंत्रण अधिकारी आर.बी. दिपटे हे गैरहजर असल्याचे आढळून आले. सदर कर्मचाऱ्यांनी आपल्या कामात हयगय व कामचुकारपणा केल्यामुळे तहसीलदार धनंजय देशमुख यांनी मोहाडी पोलिस ठाण्यात तक्रार केली. तक्रारीवरुन पोलिसांनी एस.डी. आडे, बी.ए. गजभिये, आर.बी. दिपटे यांच्याविरुद्ध कलम १८८, सहकलम ५५, ५६, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

# परजिल्ह्यात अडकलेले १९ नागरिक जिल्ह्यात परतणार

**गोंदिया-** कोरोना विषाणू संसर्गाची खबरदारी म्हणून देश व राज्यात लॉकडाऊन सुरू होते. यामुळे रोजगार व शिक्षणासाठी गेलेले जिल्ह्यातील अनेक नागरिक, विद्यार्थी परजिल्हा व परराज्यात अडकून पडले आहेत. याची दखल घेत खासदार प्रफुल पटेल यांनी वरिष्ठस्तरावर प्रयत्न सुरू केले असून सांगली जिल्ह्यात अडकलेले १९ नागरिकांना गोंदिया व भंडारा या स्वजिल्ह्यात परत आणण्याकरीता सांगली जिल्हा प्रशासनाशी पाठपुरावा केला. दरम्यान प्रशासनाच्या वतीने परवानगी मिळताच ते १९ नागरिक बस क्र.एमएच-३५/बीटी-४२३३ ने गोंदिया व भंडारासाठी रवाना झाले आहेत.

कोरोना विषाणूच्या पार्श्वभुमीवर देश व राज्यात २३ मार्चपासून लॉकडाऊन घोषित करण्यात आले होते.विषाणू संसर्गाचा प्रादुर्भाव थांबविण्यासाठी राज्य व जिल्ह्यांचा सिमा बंद करून संचारबंदी लागु करण्यात आली होती. दरम्यान या कालावधीत प्रवासी साधने बंद असल्याने नागरिक जिथच्या तिथेच अडकून पडले. जिल्ह्यातील नागरिक रोजगारासाठी परजिल्हा,परराज्यात गेले होते. लॉकडाऊनमुळे ते तिथेच अडवून पडले. सांगली जिल्ह्यात भंडारा व गोंदिया येथील १९ नागरिक अडवून पडले होते. या बाबीची दखल घेत खासदार प्रफुल पटेल यांनी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करून सांगली जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा केला.



दरम्यान परवानगी मिळताच त्या १९ नागरिकांना स्वजिल्ह्यात आणण्यासाठी हालचाली सुरू झाल्या. आणि बस क्र.एमएच-१४/बीटी-४२३३ ने त्यांची गोंदिया व भंडारा जिल्ह्याकडे रवानगी करण्यात आली आहे. त्या १९ नागरिकांमध्ये गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नागरिकांचा समावेश आहे. तर उर्वरित भंडारा जिल्ह्यातील रहिवासी असल्याची माहिती आहेत.


# मुदतबाह्य बियाणे व रिकाम्या पिशव्या आढळल्या; दोन कृषी केंद्रांना नोटीस

**गोंदिया ::** जिल्ह्यातील शेतक?यांना खरीप हंगाम - २०२० मध्ये चांगल्या दर्जाचे बियाणे मिळाले पाहिजे यासाठी जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्री केंद्रांची तपासणी आणि बियाणे नमुने काढण्यासाठी बियाणे निरीक्षकांमार्फत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. आज करण्यात आलेल्या कारवाईत एका ठिकाणी मुदतबाह्य धान बियाणे साठा व दुसऱ्या ठिकाणी एका कंपनीच्या शेकडो रिकाम्या पिशव्या आढळल्यामुळे संबंधित कृषी केंद्र संचालकांना नोटीस देण्यात आली आहे.

गोंदिया येथील मुक्ता कृषी केंद्र यांच्या आंभोरा येथे असलेल्या गोदामाची आज ९ मे रोजी तपासणी करण्यात आली.या तपासणीदरम्यान ७१० किलो मुदतबाह्य धान बियाण्यांचा साठा आढळून आल्यामुळे सदर बियाण्यांची विक्री करण्यात येऊ नये असे आदेश देण्यात आले. बियाणे निरीक्षकांच्या उपस्थितीत या साठ्याची विल्हेवाट लावण्याचे संबंधितांना सूचित करण्यात आले.

गोंदिया येथील गोरक्षण मार्केटमधील कमल कृषी केंद्राच्या सर्कस ग्राउंड येथे असलेल्या गोदामाला भेट देऊन तपासणी केली असता जिवालॉजिक्स या बियाणे कंपनीच्या रिकाम्या ३८४ पिशव्या आढळून आल्या. ह्या पिशव्या अनुचित प्रयोजनासाठी गोदामात ठेवण्यात आल्याचे दिसून आल्याने तेथेच पंचनामा करून सर्व पिशव्या ताब्यात घेण्यात आल्या आहे. संबंधित कृषी केंद्र संचालकांना याबाबत नोटीस देण्यात आली आहे.बियाणे व खते विक्री संदर्भात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे दिसून आल्यास त्यांनी त्वरित कृषी विभागाशी संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गणेश घोरपडे केले आहे.

# वेतन भत्ता मागणीसाठी ग्रा.पं.कर्मचारी व आशा सेविकांचे आंदोलन



**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ (आयटक) च्या नेतृत्वाखाली आपल्या थकीत वेतन व भत्ता मिळण्याच्या मागणीला घेवून जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून (दि.११) उपाशी पोटी व काळी फित लावून आंदोलनास सुरूवात केली.

कोरोना संदर्भात गावोगावी सर्वेक्षण करण्याचे जोखमीचे काम आशा सेविकांवर लादण्यात आले आहे. केवळ मासिक तुटपुंज्या मानधनावर राबणाऱ्या या फ्रन्टलाईन वॉरियर महिलांना शासनाने मागील वर्षभरापासून मानधन दिले नाही. तर त्यांच्या मानधनात सुध्दा वाढ केलेली नाही. याचा निषेध नोंदविण्यासाठी सोमवारी (दि.११) जिल्ह्यातील आशा सेविकांनी काळ्या फिती लावून कोरोना सर्वेक्षण व इतर कामे केली.ग्रामीण भागात आरोग्य विषयक सोयी सुविधा पुरविण्यात आशा सेविकांना महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. कोरोना सारख्या महामारीच्या काळात सुध्दा त्या घरोघरी जावून सर्वेक्षण तसेच त्यांच्यावर सोपविण्यात आलेली कामे नियमितपणे करीत आहेत. आशा सेविकांना पार अल्प मानधन दिले जात असून त्यातही मागील वर्षभरापासून त्यांना मानधन देण्यात आले नाही. परिणामी त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. वांरवार त्यांच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याची शासनाने दखल न घेतल्याने आशा सेविकांनी सोमवारपासून काळ्या फिती लावून कामे केली. काही दिवसांपूर्वी आयटकच्यावतीने आशा सेविकांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मुख्यमंर्त्यांच्या नावे निवेदन सुध्दा पाठविण्यात आले होते.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी जि.प. प्रशासनाचा निषेध नोंदविण्यात आला. जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना जानेवारी महिन्यापासून अद्यापही ग्रामपंचायतीने वेतन आणि भत्ता दिला नाही. यापुर्वीचे सुध्दा अनेक कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते थकीत आहे. याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकार व पंचायत विभागाच्या उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले. मात्र याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले आहे.

परिणामी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर उपासमारीची पाळी आली आहे. गाव पातळीवर कोरोना महामारीच्या निर्मुलन मोहिमेत अल्पशा पगारावर जिवन जगणारा हा कर्मचारी आपले राष्ट्रीय कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाळत आहे.या मोहिमेत दिवस रात्र कामे करणाऱ्या या कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते थकीत ठेवून त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. वेतन, भत्ते आणि ईतर सेवाशतीची ग्रामपंचायतीकडून अंमलबजावणी करुन घेण्याची जवाबदारी राज्याचे ग्राम विकास विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्यकार्यकारी अधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांना क्रमबद्धरित्या दिली आहे. सेवाशतीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार त्यांना दिलेले आहेत.



शासनाने दिलेल्या या दोन्ही जवाबदारीचे पालन करण्यात हे अधिकारी असमर्थ ठरत असल्याने ग्रामपंचायत कर्मचारी संघाने याचा निषेध व्यक्त केला आहे. अधिकारी वर्गाच्या अशा धोरणामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष व्याप्त आहे.


अधिकाऱ्यांच्या कर्मचारी विरोधी धोरणाचा आणि वेतन भत्ते थकीत असल्याने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून (दि.११) उपाशी राहून व काळ्या फिती लावून कामे करुन शासनाचा निषेध नोंदविला. या आंदोलनात जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचायत कर्मचारी सहभागी झाले होते.

# ककोडी परिसरात मीठाचा तुटवडा

**विनोद सुरसावत**

**ककोडीः-** शेजारच्या छत्तीसगड राज्यात मीठाचा तुटवडा निर्माण झाल्याने देवरी तालुक्यातील ककोडी चिचगड परिसरासह गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यातील व्यापाऱ्यांनी मीठाचे भाव प्रचंड वाढविले आहेत. १६० रुपयांना मिळणारी २५ किलोची पिशवी तब्बल ३०० रुपयांना विकली जात असल्याने जनतेला आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.१० रुपयाचा असलेला मिठाचा पॅकेट ३०-४० रुपयाला विकला जाऊ लागला आहे.व

देवरी तालुक्याची सीमा छत्तीसगड राज्याला लागून आहे. त्यामुळे या तालुक्यातील जनतेचे नाते आणि व्यावहारिक संबंधही छत्तीसगडशी आहेत. टाळेबंदीच्या काळात छत्तीसगड राज्यात मीठाचा तुटवडा जाणवत असल्याने सीमेशेजारचे नागरिक चिचगड व ककोडी तसेच गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यातील आपल्या नातेवाईकांना मीठ खरेदी करुन ठेवण्यास सांगत आहेत. त्यामुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक आपापल्या गावातील दुकानांतून मीठ खरेदी करुन ठेवत आहेत. परिणामी बहुतांश दुकानांतील स्टॉक संपल्याचे सांगण्यात येत आहे. यातूनच आता ककोडी परिसरासह कोरची तालुक्यातही मीठाचा तुटवडा निर्माण झाला असून, १० रुपयाला मिळणारा एक किलो मीठाचा पॉकेट तब्बल ३०-४० रुपयांना विकला जात आहे. यासंदर्भात काही दुकानदारांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, छत्तीसगड राज्याला गुजरात व मुंबईतून मीठाचा पुरवठा होतो. परंतु दोन्ही ठिकाणांहून मीठाचा पुरवठा कमी होत असल्याने छत्तीसगडमध्ये मीठाचा तुटवडा निर्माण झाला आहे.तसेच मिठाचा कारखाना बंद झाल्याचे सांगत पुढे मिठ मिळणार नसल्याच्या अफवेने नागरिकांत संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे.



राजनांदगाव व गोंदिया येथील मोठ्या व्यापाऱ्यांकडे मीठाची मागणी केली असता त्यांनीही तेथेही मीठाचा तुटवडा असल्याने मागणी पूर्ण करु शकत नसल्याचे सांगितले. त्यामुळे नजीकच्या काही दिवसांत तालुक्यातील नागरिकांच्या अन्न बेचव होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान छत्तीसगडच्या आमदार श्रीमती छन्नी चंदू शाहू यांनी लोकांना कुठल्याही अफवेवर विश्वास ठेऊ नये मिठाची कुठेच कमतरता नसल्याचे सांगत अफवा पसरविणाऱ्यावर कारवाई करण्यात येणार असा इशारा दिला आहे.

महात्मा गांधींनी गोरगरीब जनतेला स्वस्त दरात मीठ उपलब्ध व्हावे यासाठी मीठाचा सत्याग्रह केला होता. त्यामुळे स्वांतर्त्याच्या ७३ वर्षाच्या काळात मीठाची किंमत खूप न वाढता ते स्वस्त दरातच उपलब्ध होत राहिले. परंतु टाळेबंदीचे निमित्त करुन व्यापारी गांधीजींच्या मूळ हेतूलाच हरताळ तर फासत नाही ना, असा प्रश्न उपस्थित होत आहे.